# चैतन्य लहरी



अंक क्र. ११, १२

नोव्हेंबर-डिसेंबर ९९







# ☆ अनुक्रमणिका ☆


| अनु.क्र. | | पान नं. |
|---|---|---|
| १) | सर्व सहजयोगी बंधू भगिनींचे सहकार्याबद्दल आभार | ३ |
| २) | संपादकीय | ५ |
| ३) | श्री गणेश पुजा (कबेला : २५ . ९. ९९) | ६ |
| ४) | सहजयोगी बंधू भगिनींच्या माहिती करीता | १० |
| ५) | विराट पूजा (कबेला : ५ सप्टेंबर ९९) | १२ |
| ६) | सहजसमाचार | १४ |
| ७) | ऑल रशिया सायंटिफीक परिषद (रशिया : जून ९८) | १६ |
| ८) | श्री योगी महाराजांनी केलेल्या मार्गदर्शनाचा सारांश | २० |
| ९) | श्रीकृष्ण पूजा (फ्रान्स १६.८.८७) | २१ |
| १०) | चक्रे स्वच्छ करण्याची माहिती | २३ |

**शुद्धि-पत्रक**

चैतन्य लहरी अंक क्र. ९, १० (सप्टें-ऑक्टो ९९)

१) अनुक्रमणिका : क्र. ७ महिषासुरमर्दिनी पूजा बंगलोर, फेब्रुवारी ९९ ऐवजी फेब्रुवारी ८९

२) पान क्र. १० : गणेश पूजा, मॉस्को ११ सप्टेंबर ९९ ऐवजी ११ सप्टेंबर ९४

मुद्रण - चुकीबद्दल दिलगीर आहोत.

# संपादकीय

चैतन्य लहरी हा सहजयोगाचा विशेष व परम पूज्य श्री माताजींचे मानवास हे वरदान आहे. हे वरदान सर्वसामान्य लोकांना मुक्तहस्ताने इतर कोणत्याच अवताराने दिले नाही. परम पूज्य श्री माताजींच्या चरणातून हा गंगौघ सततच प्रवाहित असतो.

सुधा धारा सारैः श्चरण युगुलान्तर विगलित

असे श्री आदिशंकराचार्यांनी वर्णन केले आहे.

या चैतन्याची संतांना जाणीव होती व विविध प्रकारे त्यांनी ते दर्शविले आहे. अमृत ही संकल्पना चैतन्य लहरीच दर्शविते. सुधा अथवा अमृत याचा अर्थ ज्याला मृत्यू नाही ते, अर्थात अविनाशी. चैतन्य लहरींचे जे गुण आहेत, उदा. रोगनिवारक, संजीवक, मार्गदर्शक, पोषक इत्यादींचे वरुन चैतन्य लहरी म्हणजेच अमृत असे लक्षात येते. अमृत म्हणजे देवांचे पेय असे मानले जाते. परंतु देवांना मानवाप्रमाणे जड शरीर नसून त्यांची शरीरे वायूवत व चैतन्यमय असल्याने त्यांचे पेयही वायू प्रमाणेच असावे.

सौंदर्य लहरी या ग्रंथाच्या आठव्या श्लोकात श्री आदिशंकराचार्यांनी वर्णिले आहे. 'हे आदिशक्ति, अमृताच्या समुद्रातील मणिद्वीपात, कदंब वृक्षाच्या बागेत, चिंतामणी रत्नांच्या घरात, शिवतत्त्वाच्या मंचकावर, परमशिवांच्या अंकावर आपण आरुढ आहात, चिदानंद लहरी स्वरुप अशा आपल्याला भजणारे धन्य होत! सहज योग्यांच्या हे लक्षात आले असेलच की वैश्विक व निर्गुण अशा विराट स्वरूपाचे ते रुपकात्मक वर्ण आहे. यातील शिवतत्वाचा मंचक म्हणजे हृदय. चक्रातील शिवतत्व व परमशिवांचा अंक म्हणजे सहस्त्रार की ज्याचे वर श्रीसदाशिवांचे स्थान आहे. याच स्थानासत श्री आदिशक्तींचे वास्तव्य आहे व त्यांचे स्वरूप चिदानंद लहरी हे आहे.

श्री आदिशंकराचार्यांनी व इतर संस्कृत ग्रंथकारांनी यास स्फुरण अथवा स्पंद असे सुद्धा संबोधिले आहे. विद्वानांना चैतन्यांची अनुभूति नसल्याने त्यांनी स्पंद अथवा स्फुरण या शब्दांचा अर्थ केवळ जीवाची हालचाल असा केला आहे. परंतु तो सहजयोग्यांना मिळालेल्या प्रकाशात योग्य वाटत नाही. ''यस्यैव स्फुरणं सदारमकं असत कल्पार्थगं भासते!'' असत, म्हणजे जड पदार्थामधून ज्यांचे (श्री शिव) स्फुरण, प्रत्ययास येते, असे दक्षिणामूर्ति स्त्रोत्रात श्री आदिशंकराचार्य म्हणतात. 'दक्षिणामूर्ति-रुपिणी' हे ललिता सहस्त्रनामात श्री माताजींचे एक नाव आहे.

समर्थ रामदासांनी दास बोधात, चैतन्यलहरी म्हणजे मूलमायेचा आविष्कार आहे असे स्पष्ट शब्दात सांगितले आहे.

ब्रह्मी मूळमाया जाली । तेचि अष्टधा प्रकृति बोलिली ।<br>
मूती त्रिगुणी कालवली । मूळमाया ॥ –9<br>
ते मूळमाया वायोस्वरुप । वायोमध्ये जाणीवेचे रुप ।<br>
तेचि इच्छा परी आरोप । ब्रह्मी न घडे ॥ –10<br>
माया जाणीजे समीर । तीत जाणता तो ईश्वर ।<br>
ईश्वर आणि सर्वेश्वर । तयासीच बोलिजे ॥ –16<br>
– दशक 10, समास ४

वायो जाणीव जगज्ज्योती । तयास मूळमाया म्हणती ।<br>
पुरुष आणि प्रकृती । यांचेच नाव ॥ –7<br>
वायोस म्हणती प्रकृती । आणी पुरुष म्हणती जगज्जोती ।<br>
पुरुष प्रकृती शिवशक्ती । यांचेच नाव ॥<br>
वायोमध्ये जाणीव विशेष । तोचि प्रकृतिमध्ये पुरुष ।<br>
ये गोष्टीचा विश्वास । धरिला पाहिजे ॥ 9<br>
वायो शक्ति जाणीव ईश्वर । अर्धनारी नटेश्वर ।<br>
लोक म्हणती निरंतर । येणे प्रकारे ॥ –10<br>
वायोमध्ये जाणीव गुण । तेंचि ईश्वराचे लक्षण ।<br>
तयापासून त्रिगुण । पुढे जाले ॥ 11<br>
– दशक 10 समास 11

चैतन्य लहरींचे अस्तित्व स्वयंभू मूर्तिमधे, आत्मसाक्षा-त्कारी संतांनी वापरलेल्या वस्तूंमधे, त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी, सूर्य, चंद्रतारे, पृथ्वी, समुद्र, आकाश, अग्नि, साक्षात्कारी संतांच्या संगीतात, शब्दांत कलाकृतींमधे व वाङमयात असतात. त्यांच्या सत्यतेची ग्वाही देतात. वेद, उपनिषदे, गीता, बायबल, कुराण, ललिता सहस्त्रनाम तसेच विष्णू, शिव आदि देवतांची सहस्त्रनामे वाचताना या चैतन्यलहरी जाणवितात. परम पूज्य श्रीमाताजींची प्रवचने ऐकताना व वाचताना चैतन्य लहरींचा आनंद मिळतोच व सर्व चक्रेही स्वच्छ आणि सशक्त होतात हा सर्व सहजयोग्यांचा अनुभव आहे

श्री ज्ञानेश्वरांना त्यांच्या शब्दातील चैतन्याविषयीचा आत्मविश्वास त्यांच्या वाङमयकृतींमध्ये दिसून येतो. सहाव्या अध्यायाचा प्रारंभी ते म्हणतात ''आहाच बोलाची वालीफ फेडिजे। आणि ब्रह्मचिया आंगा घडिजे । मन सुखेसी सुर वाडिजे सुखाची माजी ॥२५॥

तेणे कारणे मी बोलेन । बोली अरुपाचे रुप दावीन । अतींद्रीय परी भोगवीन । इंद्रीयांकरवी ॥३६॥

पवित्र बायबल, कुराण या ग्रंथांमधेही चैतन्य लहरींचा निराळ्या शब्दात उल्लेख आहे हे आपण जाणतोच.

रशिया मधे चैतन्य लहरींवर शास्त्रीय संशोधन झाले आहे. त्यात असे आढळले आहे की जड सृष्टीच्या पुढे सूक्ष्म प्लास्मा फील्ड असून त्याच्याही व मानवी चेतनेच्या पलिकडे पोकळी स्वरुप. एक क्षेत्र असून शास्त्रज्ञ त्यास टॉर्शन फील्ड म्हणतात. यामधून, सर्व शास्त्रज्ञांना प्रेरणा मिळतात. सहज योग्यांना श्रीमाताजींचे कृपेला प्राप्त झालेल्या चैतन्यलहरी म्हणजेच हे टॉर्शन फील्ड होय.

सहजयोग्यांना या चैतन्य लहरींचे महत्व स्वानुभवावरुन लक्षात आले असेलच. नवीन लोकांना चैतन्य लहरींचा आनंद व उपयोग यांचा प्रत्यक्ष अनुभव आल्यास, ते सहज योगात लवकर प्रस्थापित होऊ शकतील.

सहज योग्यांनी श्री माताजींचे कधीही न फिटणाऱ्या ऋणाचे स्मरण केल्यास त्यांच्या चैतन्य लहरी अधिक वृद्धिंगत होतील.

●●●

# श्री गणेश पूजा

**प. पू. श्री माताजी निर्मला देवी यांचे भाषण (सारांश)**
**कबेला : २५-९-९९**

आज आपण श्री गणेशपूजनासाठी जमलो आहोत. ते एक शक्तीमान अशी देवता आहे हे तुम्ही जाणताच. त्यांची ही शक्ति अबोधितेतूनच उत्पन्न होते. लहान बालकाकडे आपण आपोआप आकर्षित होतो. त्यांचेविषयी प्रेम वाटते, त्यांचेबरोबर रहावेसे वाटते कारण ते निरागस असतात. जेव्हा आपण श्री गणेशांचे पूजन करतो त्यावेळेस आपण निष्पाप आहोत की नाही हे पहावे. आपण सध्या पहातो बहुतेक लोक अत्यंत धूर्त झाले आहेत. मर्यादा न ठेवता, जे लोक साधेभोळे आहेत, त्यांचेशीही ते धूर्त डावपेच खेळतात. त्यांचे समर्थनही करतात. यामुळे तुम्ही उजव्या बाजूस अगदी टोकाला जाता व स्वतःवर शिक्षा ओढवून घेता. शारीरिक व्याधीस आमंत्रण देता. उदा. उजवी बाजू बधीर होणे किंवा पाय बधीर होणे किंवा यकृताच्या समस्याही निर्माण होऊ शकतात. हे सर्व मानसिक विकाराकडे नेऊ शकते. अशा उजव्या बाजूस झुकलेल्या लोकांनी श्री गणेशांची आराधना करावी. सध्याचे गतीमान जीवन, मर्यादेबाहेर परिश्रम घेणे यामुळे श्री गणेशांवरचे लक्ष उडते. अशी माणसे शुष्क होतात. स्वतःमध्येच अडकतात, कोठे चाललो हे कळत नाही. अशा वेळी श्री गणेशांचे पूजनाने, आराधनेने तुम्ही मधोमध राहू शकता. उजव्या बाजूच्या सर्व व्याधी श्री गणेश पूजनाने दूर होऊ शकतात. तुमचे झगडे, तुमच्या चिंता श्री गणेशांचे कृपेत विरून जातात. ते जरी निरागस असले तरी सूज्ञ आहेत. तुमचे प्रश्न, तुमचे अडथळे सोडविण्यात ते कशी मदत करतात हे पाहिले तर तुम्ही थक्क व्हाल. श्री गणेश हे सरळ साधे आहेत. पण मूलाधार चक्र हे फार गुंतागुंतीचे आहे. त्याच्या अनेक चैतन्यलहरी आहेत. त्याचे अनेक भाग, त्यातून अनेकदा चैतन्य लहरींचे स्पंदन चालू असते. हे लाभ मिळविण्याठी तुम्ही श्रीगणेशांना शरण गेले पाहिजे.

मी सांगितलेले आहेच की श्री जीझस हे श्रीगणेशाचे अवतार होते. ते निरागस होते, ते निष्पाप होते, म्हणूनच ते सुळावर गेले. ज्या भक्तांनी त्यांना फसविले हे माहित असूनही ते त्यांच्याबद्दल कधी बोलले नाहीत. सर्व जीवन निष्पापतेने व्याप्त होते. अन्यायाविरुद्ध ते उभे राहात. तसेच श्री गणेशांचे आहे. त्यांचे आशिर्वाद मिळून जे भक्त संकटात असतात त्यांची विघ्ने ते दूर करतात (संकटविमोचन). तुमच्यातील अनेकांनी अनुभव घेतला असेलच की ते अडचणीत कशी मदत करतात. अडथळे हटवितात. सर्व काही व्यवस्थित घडवतात. कारण ते गणपती आहेत, गणांचे देव. हे गण म्हणजेच तुमच्यात असलेले सूक्ष्म जीव. जेव्हा बाहेरचे आक्रमण होते तेव्हा ते मेंदूला संदेश देतात व सॅनम बोनमध्ये आंदोलने निर्माण होतात. जे दुर्गामातेचे सिंहासन आहे (निवास). तेव्हा गणांना (Antibodies) ही बातमी कळते, ते आपले लक्ष्य बरोबर शोधतात व हल्ला करतात. जे मानसिक विकारांचे बळी आहेत त्यांनाही हे गण मदत करतात. हे सर्व आश्चर्यकारक आहे. एखादे मूल अडचणीत सापडले तर आईवडील आपल्या मातेचा (दुर्गामाता) धावा करतात. आपोआप त्या मुलाकडे धावतात व त्याची सुटका होते. हे सर्व गण फार सतर्क असतात. कायम सजग असतात. कधीही झोपत नाहीत. कोठेही समस्या निर्माण झाली की ते हल्ला चढवितात. हे सर्व पाहून आश्चर्य वाटते की हे सर्व घडले कसे. अशी बरीच उदाहरणे आहेत. अमेरिकेतील आश्रमातील एक मुलगा पोहोण्याच्या तलावात पडला. पंधरा मिनिटे आत होता. जेव्हा तेथील लोकांना हे समजले तेव्हा फार घाबरले. त्याला बाहेर काढले व माताजींची प्रार्थना करू

लागले. मला फोन नंबरही कधी माहित नसतो. कुठल्या आश्रमात मी स्वतः फोन करत नाही पण त्यावेळी मी त्या आश्रमात एका नंबरवर फोन करण्यास सांगितले व आश्चर्यकारक रित्या तो त्या आश्रमाचाच होता व तेथील प्रमुखांना सांगितले की मला सर्व समजले व तो मुलगा वाचेल, त्याला काही होणार नाही. मुलाला त्यांनी चैतन्यलहरी दिल्या व डॉक्टरकडेही नेले. डॉक्टर म्हणाले तो वाचण्याची शक्यता नाही आणि वाचला तर तो बेशुद्धावस्थेतच राहील. आश्चर्य म्हणजे तो पूर्ण बरा झाला. आतापर्यंत तो पूर्ण व्यवस्थित आहे. आता अमेरिकेला गेले त्यावेळी त्या मुलाला मी भेटले. अशा अनेक घटना घडतात लोक म्हणतात, श्री माताजी आपल्या आशीर्वादाने व आपल्या कृपेने सर्व घडते. पण पर्याप्तपणे ही श्री गणेशांचीच कृपा आहे.

दुसरे महत्त्वाचे म्हणजे श्री गणेश आपल्या मातेच्या पूर्णपणे आज्ञेत असतात. एरवी ते शिव, विष्णु यांनाही बधत नाही. माता हे त्यांचे सर्वस्व आहे. वेळ आली तर आपले पिता शिव यांच्याशीही झगडतील इतके ते आज्ञाधारक, तत्पर आहेत. त्यांना आईच्या इच्छा काय आहेत ते समजते व तसे घडवितात. ते सर्व सहजतेत निरागसतेतून घडवून आणतात. सर्व गणही तसेच निरागस आहेत. पण जेव्हा त्यांना एखाद्या समस्येविषयी कळते की सत्वर तयार होतात. दुसरी विशषेतः जे लोक पवित्र आहेत, पवित्रतेला मानतात त्यांचा ते आदर करतात. शुद्धता ही नेहमीच पूजनीय आहे. ती फक्त स्त्रियांकरिता नसून, पुरुषांकरिताही आहे. श्री गणेशांनाही हे अपेक्षित आहे. तुमची दृष्टीही भिरभिरणारी नसावी. विशेषतः स्त्रियांप्रती ती शुद्ध असावी. आत्मसाक्षात्कारानंतर तर ती निर्मल असावी, स्थिर असावी. विचारही शुद्ध असावा. आपले परीक्षण करावे, कुठे चुकतो हे पहावे आणि स्वतःला सुधारवे. श्री गणेशांची क्षमा मागावी ते सत्वर क्षमा करतात. हे फार महत्त्वाचे आहे. आपली नीतिमत्ता आपल्या शुद्धतेच्या कल्पनेवर अवलंबून आहे.

आपण त्या पवित्रतेतच रहावे. त्याबद्दल सर्व धर्मांनी सांगितले आहे. पण त्या धर्मांनाही अर्थ राहीला नाही कारण तो पायाच हादरला आहे. स्वतः काय पाहिजे तसे ते वागतात व म्हणतात आम्ही हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन इ. तसे सर्व धर्म बाद होत चालले. आणि म्हणून श्री गणेशांना तिकडे बघावे लागले. श्री गणेशांचा जन्म पवित्र धरणी मातेतून झाला आहे. जे लोक काळी विद्या वापरतात, जे कर्मठ आहेत, जे अनैतिक आहेत त्यांच्यावर ते नाराज असतात. त्यामुळे जे त्यांच्यापुढे समस्या निर्माण करतात. भूमातेला ते भूकंप घडविण्यास सांगतात. आपल्या मातेमार्फत त्यांच्यावर ते चढाई करतात. आता तैवान व तुर्कस्थानमध्ये जे भूकंप झालेत. त्यात एकाही सहजयोग्याला इजा पोहोचली नाही. ते त्यांचे रक्षण करतात. जे नैतिक आहेत. वरील प्रकारच्या लोकांना नाश होते. आधीही असे घडलेले आहे. भूमातेच्या शक्ती त्यांच्यात आहेत. जसे त्यांच्यातील चुंबकीय आकर्षण, ज्यामुळे लोक विशेषतः मुले त्यांच्याकडे आकर्षित होतात. पक्षांनाही त्यामुळे दिशेचे ज्ञान होते. ते सैबेरियातून ऑस्ट्रेलियात जातात व परत येतात. तसेच ही शक्ति पाण्यातील माशांनाही असते. ते पर्वतावरील पाण्याबरोबर वाहत येता व परत आल्या जागी जातात. अशा रीतीने गेणशतत्व त्यांना आपल्या जागी नेते. कारण केवळ दिशेच्या ज्ञानाने व त्यांच्या अंगच्या गुणांनी ते बांधलेले असतात. सर्प हा सर्पच राहतो. कुत्रा हा कुत्र्याप्रमाणेच वागतो तसेच सिंहाच्या बाबतीतही. पण मानवात मात्र सर्व प्राण्यांचे गुण आढळतात. अगदी धूर्तपणे सर्व काही चालते. इतक्या खालच्या पातळीला मनुष्य जाऊ शकतो. तसेच घडते कारण ते आपल्या जीवनात श्री गणेशांचा आदर करत नाही. भारतातील लातूरचे उदाहरण घ्या. गणेशोत्सवात गणेशमूर्तीपुढे सिनेमातील घाणेरडी गाणी लावली, हिडीसपणे नाचले. तुम्हा लोकांनाही हे आवडणार नाही. त्यामुळे श्री गणेशही नाराज होतात. विसर्जनानंतरही मद्यपान करून अश्लीलपणे नाचत जय गणेश घोषणा करत नाचू लागले.

नंतर त्याचवेळी भूकंप झाला व धरणीने सर्वांना आत ओढून घेतले (गाडले गेले) पण सहजयोग केंद्र व तेथील भोवतालचा भाग यांना धक्कासुद्धा लागला नाही. एकाही सहजयोग्याला त्याची झळ पोहचली नाही व सर्वजण सुरक्षित राहिले. अगदी व्यवस्थित. श्री गणेश व त्यांचे गण कसे रक्षण करतात बघा. गणांचा आपण आदर ठेवला पाहिजे. ते आपल्या भोवती व आपल्या आतही आहेत. ते कार्यरत असतात व त्या व्यक्तीवर लक्ष ठेवून असतात आणि तुम्ही श्रीगणेशांचा अनादर केला तर तुम्हाला तुमची जागा दाखवितात. तुम्हाला संधी दिली जाते पण धूर्तपणे तुम्ही अहंकारातून दुर्लक्ष केले तर श्री गणेश रागावतात व तेच भयंकर संकट होय. म्हणून श्री गणेशांची आराधना करा. पण प्रत्येक गणेशमूर्तीची पूजा करू नका ते व्यर्थ आहे. म्हणूनच श्री महंमदसाहेबांनी मूर्तीपूजा करू नका असे सांगितले. कारण त्या अशा अपात्र लोकांनी बनविलेल्या असतात व त्या स्वयंभू नसतात, केवळ पैसा बनविण्याच्या उद्देशाने केलेल्या असतात. अशा अपात्र, लबाड लोकांनी बनविलेल्या मूर्तीची पूजा केली तर तुम्हालाच अपाय होईल. श्री गणेशांचा खरा फोटो अस्तित्वात नाही. भूमीतून निर्माण झालेले श्री गणेश (अष्टविनायक) मी पाहिलेले आहेत. तेथील पूजाऱ्यांनाही मी भेटले. ते सांगतात आम्ही एवढी श्री गणेशांची सेवा करतो पण आम्हाला दमा, अर्धांगवायु या प्रकारचे आजार का? मी सांगितले स्वतःचे परीक्षण करा. आपले काही चुकते का ते पहा व आपण गणेशपूजेसाठी पात्र आहो का याचा विचार करा. मी त्यांना म्हणाले तुम्हाला मी ठीक करते पण लोकांना बनवू नका. साधा भोळेपणा ठेवा, धूर्तता सोडा. श्री गणेशांच्या नाराजीमुळे तुम्हाला किती अडथळे येतील किती त्रास होईल याची कल्पना करवत नाही. अगदी तुम्ही शेवटाला जाल. ते इतके शक्तीमान आहेत की इकडचा पर्वत तिकडे हलवू शकतात. त्यांच्यातील जे कठोर आहेत ते पण बदलतात. स्वस्तिक हे त्यांचे प्रतीक आहे, उजवीकडच्या दिशेचे आहे, ते जर उलटे केले तर नाश ओढवून घेता. हिटलरने ते योग्य दिशेने वापरले तोपर्यंत त्याला विजय प्राप्त झला. पण जेव्हा त्याचा छाप उलटा झाला तेव्हा त्याचा नाश झाला. स्वस्तिक किती शक्तिपूर्ण आहे हे समजते हे सर्व कार्बन अ‍ॅटममधून निर्माण झाले. कार्बन अ‍ॅटमला डावीकडून उजवीकडे पाहिले तर ॐकार दिसतो. उजीवकडून डावीकडे पाहिले तर स्वस्तिक दिसते. खालून वर पाहिले तर क्रॉस दिसतो म्हणजेच क्रॉस हा गणेशाचाच अवतार आहे. त्याला सर्व जगात भजले जाईल. तो अंड्यातून कसा जन्माला इ. वर्णन देवीमहात्म्यात स्पष्ट दिलेले आहे. अंड्याच्या अर्ध्या भागातून खाईस्ट आले व अर्धा भाग श्रीगणेशांचा होय. आपणामधील गोंधळामुळे आपण हे समजू शकत नाही. जे खिस्तांना भजतात ते श्रीगणेशांनाही भजतात, ते वगळे नसून एकच आहेत. त्यांनी जी दोन बोटे दाखविली, त्यातील एक विशुद्धीचे व दुसरे श्री विष्णूंचे. ते दोघेही त्यांचे पिता होते व चैतन्यलहरीतून आपण हे जाणू शकता. तुम्ही श्री गणेशांचे स्मरण केले व चैतन्य लहरीकडे लक्ष दिले की तुमचे आज्ञा चक्र उघडेल आणि तुम्ही निर्वाचरतेत जाल. कारण जीझस हे आज्ञाचक्रावर आहेत मग आज्ञाचक्राचे जे अपसमज आहेत ते आपोआप दूर होतात. कारण श्री गणेशांच्या चिंतनाने आज्ञा स्वच्छ होते. दुसऱ्याबद्दलच्या आपल्या डोक्यातील वाईट भावना दूर होतात. आपले मूलाधार चक्र चांगले स्थितीत असल्यामुळे तो एक मोठा आशिर्वादच आपल्याला मिळतो. आपण भूमीवर बसलो असताना. तीही तुम्हास मदत करते. भूमातेकडे आपण दूर्लक्ष करू नये. तिची निगा राखली पाहिजे. भारतीय संस्कृतीमध्ये सकाळी आपण उठतो तेव्हा क्षमा मागून मगच भूमीवर पाऊल टाकतो. त्यामुळे प्रदूषणासारख्या समस्या तुम्हाला येणार नाहीत. भूमाता ही गणेशांची माता आहे व गणेश हे आपल्या मूलाधारावर असतात हे लक्षात ठेवून आपण भूमातेला उत्तमपणे सजवणे, तिचे सौंदर्य वाढविणे इत्यादीतून तिची काळजी घेतली पाहिजे. तिने जी झाडे इ. निर्माण करून, ती तोडून आपल्या स्वार्थाकरिता

त्याचा उपयोग करतो, त्यामुळे आपण चुकतो व वातावरण दूषित करतो हे चुकीचे आहे. एक झाड तोडले तर दुसरे लावले पाहिजे. झाडे हे तिचे सौंदर्य आहे. तसेच हिरवळही. निसर्गाची, बागकामाची काही लोकांना आवड नसते याचे आश्चर्य वाटते. निसर्ग किती स्वच्छ, सुंदर आहे. झाडांच्या प्रत्येक पानांना ऊन मिळावे याची काळजी घेतलेली दिसते. प्राणीही त्यांना इजा पोहोचवत नाहीत. फार तर गवत वगैरे खातील. आपल्याला कितीही गरज भासली तरी भूमातेचा आदर केला पाहिजे. भूमाता ही गणेशाची माता आहे, जो ज्येष्ठ असा सहजयोगी आहे. त्याला योगाची जरुरी नाही, पण योगामध्ये ते आहे व सर्वश्रेष्ठ योगी आहे. कधीही चुकीची गोष्ट करत नाही. सर्व देवतांमध्ये त्यांचे स्थान उच्च आहे. त्यांचे सतत पूजन केले पाहिजे. त्यांचेबरोबर सर्व देवतांचे पूजन घडते व ते सर्व प्रसन्न होतात.

आजच्या आधुनिक काळात लोक बिघडल्यामुळे आपल्या मोठेपणासाठी नीतिमत्ताही सोडतात. अशा वागण्याने स्वतःला कमीपणा आणतात. अशा अशुद्ध गोष्टीपासून लोकांनी स्वतःला दूर ठेवले पाहिजे. त्यामुळे श्रीगणेश नाराज होतात. शुद्धता हा आपला पाया आहे हे समंजसपणे जाणले पाहिजे.

भारतात आपले पावित्र्य अबाधित राखण्यासाठी 32000 स्त्रिया सती गेल्या. मी त्याच कुळातील आहे. त्या किती धैर्यशील व पावित्र्यावर त्यांचा किती विश्वास होता हे दिसून येते. पावित्र्यतेशिवाय आपल्या जीवनाला अर्थ नाही. स्त्रियांनाच नाही तर पुरुषांनाही हे लागू आहे व ते महत्त्वाचे आहे. श्री गणेशांचे महत्त्व विसरले तर पुरुषात अनेक प्रकारच्या व्याधी निर्माण होऊ शकतात. श्री गणेशाकडे चित्त ठेवले तर आरोग्यही उत्तम रहाते. ते सतत आपल्याला सुधारत असतात. काळजी घेतात व रक्षण करतात. ते मूलाधारात असल्यामुळे कुंडलिनीचे रक्षण करतात. जेव्हा एखादी समस्या निर्माण होते. तेव्हा कुंडलिनीला वर उचलण्यास ते आधार ठरतात. हाच आपल्या आत्मसाक्षात्काराचा पाया आहे. श्री गणेशांचे हे महत्त्व जाणून आपले आत्मपरीक्षण करत, त्यांना आपण पूर्ण शरणागत आहोत हे पाहिले पाहिजे. घाणेरड्या गोष्टी दूर करण्यासाठी झटले पाहिजे. लहान मुलांसारखे निष्पाप रहावे. काही वेळेला अशा लोकांना फसविले जाते व त्रासही होतो. पण गणेश त्यांच्या अबोधितेतून त्यांचे रक्षण करतात. पण तेही लयाला जातात जे त्रास देतात. अशा लोकांना छळले जाऊ नये, हे थांबले पाहिजे. नाहीतर याला शेवट नाही आणि सर्वनाश होईल. अमेरिकेतील रेड इंडियन्सचाही असा इतका छळ केला की त्यांना दुसऱ्या देशात धाव घ्यावी लागली. त्यांच्या कानाजोरी या ठिकाणी मी गेले होते. तिथल्या चैतन्यलहरीवरून ते खूप साधेभोळे वाटले. एवढ्या वर्षानंतरही तिथले चैतन्य टिकून आहे. ते अतिशय निष्पाप होते. अध्यात्मिकदृष्ट्या ते प्रबळ होते. कारण ते भूमातेची पूजा करत ऑस्ट्रेलियातही मावरी जातीचे लोक होते. आता त्यांना इतराबारीवरीचा दर्जा देण्यात आला, ही चांगली बाब आहे.

ऑस्ट्रेलियातील उलुरु टेकडी हे श्रीगणेशांचे प्रतीक आहे. ती गणेशस्वरूप टेकडी आहे. सोंडही लांब अशी दिसते. चैतन्य लहरीद्वारे श्री गणेशांचे स्वयंभू आहेत हे जाणवते व आहेच. असे अनेक ठिकाणी श्री गणेश निघालेले आहेत व येथेही ते चैतन्यलहरींचे उगमस्थान वाटते. त्यांच्या कृपेनेच ऑस्ट्रेलियात सहजयोग फोफावला व तिथल्या सरकारनेही कधी त्रास दिला नाही. हा उलुरु श्रीगणेश त्यांना संरक्षण देतो व त्यामुळेच सहजयोग वाढत आहे. तुम्ही कोठेही असा श्री गणेशांची पूजा केली पाहिजे मग ते तुम्हाला पूर्ण मदत करतात, बघून चमत्कार वाटेल. म्हणून आपल्यातील पवित्रतेला श्रीगणेशांना सांभाळा.

तुम्हाला ईश्वराचे अनेक आशिर्वाद.

● ● ●

# सहजयोगी बंधू भगिनींच्या माहिती करिता

१) सहजयोग्यांना ज्ञात आहे काय? कोणत्या भविष्य विषयक ग्रंथात परमपूज्य श्री माताजींच्या अवतारा विषयी व सहजयोगा विषयी भविष्य वाणी केली आहे?

**- ''भृगू संहिता व नाडी ग्रंथ''-**

२) मी आता जातो व ''द काऊन्सलर'' ''द कंफर्टर'' व ''द रिडीमर'' यांना पाठवीन असे आपल्या शिष्यांना कोणी सांगीतले?

**- श्री येशू खिस्तानी -**

३) पवित्र कुराणात व्हायब्रेशन्सला काय म्हणतात?

**- रूह - असे म्हणतात**

४) ऑस्ट्रेलिया देशातील आयर्स नामक डोंगर कोणत्या देवतेचे स्वयंभू स्वरूप आहे?

**श्री गणेश यांचे**

५) मक्का येथील मंदीरातील काबा हे कोणत्या देवतेचे स्वयंभू स्वरूप आहे?

**श्री शिव - मक्केश्वर शिवांचे**

६) पवित्र बायबल या ग्रंथात चैतन्य लहरींसाठी कोणते शब्द आहेत?

**कूल ब्रीझ ऑफ होली घोस्ट**

७) श्री आदिशंकराचार्यांनी चैतन्य लहरींचे वर्णन कोणत्या शब्दात केले आहे?

**सलील - सलीलम्**

८) १९४७ साली दिल्ली येथे धार्मिक दंगल उसळली असता दोन कुटुंबांना श्री माताजींनी आश्रय देऊन त्यांचे प्राण वाचविले त्याच्यापैकी एक महिला प्रसिद्ध अभिनेत्री झाल्या व पुरूष हिंदी चित्रपटातील प्रसिद्ध गीतकार झाले - त्यांची नावे अशी-

**महिला- अचला सचदेव व पुरूष- साहिर लुधियानवी**

९) **श्री माताजींच्या वडिलांचे नाव :** श्री प्रसादराव केशवराव साल्वे ते नागपूर येथे प्रसिद्ध वकील होते. त्यांचे १४ भाषांवर प्रभुत्व होते. पवित्र कुराण या ग्रंथाचे त्यांनी हिंदीमध्ये भाषांतर केले.

**श्री माताजींच्या मातोश्रींचे नाव**

१०) सौ. कार्नेलिया बाई : त्यांचा जन्म २० डिसेंबर १८९२ रोजी नांदगाव शिंगवे जिल्हा अहमदनगर येथे झाला. त्यांनी पुणे येथील फर्गसन कॉलेज मधून गणित विषयात ऑनर्सची पदवी संपादन केली. रँग्लर र. पु. परांजपे यांच्या त्या विद्यार्थीनी होत्या. पुढे नागपूर येथील सेंट उर्सुला हायस्कूलच्या मुख्याध्यापिका झाल्या.

-

११) श्री माताजींचे पती **श्री चंद्रिकाप्रसाद श्रीवास्तव** कोणत्या पब्लिक सेक्टर कंपनीचे चेअरमन होते?

**''शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया''**

१२) श्री. श्रीवास्तव साहेब, कोणत्या आंतरराष्ट्रीय संघटनेचे प्रधान सचिव (सेक्रेटरी जनरल) होते?

**इंटर नॅशनल मेरीटाईम ऑर्गनायझेशन (संयुक्त राष्ट्र संघटनेची एक संघटना)**

त्यांची या पदावर चार वेळा बिनविरोध निवड झाली. एकूण सतरा वर्षे त्यांनी हा कार्यभार उत्तम रितीने सांभाळला. त्यांच्या कार्यकाळात सभासद देशांची संख्या १३२ पर्यंत वाढली. अमेरिका, रशिया, चीन यांच्या सारख्या एकमेकांच्या विरोधात असलेल्या देशांनी सुद्धा श्री. श्रीवास्तव साहेबांना एक मताने निवडले. त्यांच्या कार्याबद्दल ३२ देशांनी त्यांच्या देशातील सर्वोच्च पदव्या देवून गौरव केला.

-

१३) इंग्लंडच्या राणीने त्यांना नाईट हूड प्रदान केले. त्यांचे नाव काय?

**''द नाईट कमांडर ऑफ मोस्ट डिस्टिंग्विश्ड ऑर्डर ऑफ सेंट माईकेल अ‍ॅण्ड जॉन''**

—

१४) श्रीवास्तव साहेबाना भारत सरकारने १९७२ साली कोणती पदवी दिली?

**''पद्म भूषण''**

१५) परमपूज्य श्री माताजींचा जन्मदिवस, जन्मस्थान व जन्मवेळ यांचे वैशिष्ट्य काय?

श्री माताजींचा जन्म २१ मार्च १९२३ साली छिंदवाडा येथे दुपारी १२ वाजता झाला.

(अ) २१ मार्च या दिवशी-दिवस व रात्र यांचा कालावधी सारखाच असतो. तो वारही बुधवार होता.

(ब) दुपारी बारा ही वेळ मध्यानीची असते.

(क) छिंदवाडा हे शहर भारताच्या मध्यभागी आहे.

(ड) श्री माताजी बारा अपत्यांपैकी सातवे आपत्य आहेत.

१६) श्री माताजींनी तरुणांना दर्जेदार चित्रपट काढण्यास प्रोत्साहन देण्यासाठी एक संस्था १९६१ मध्ये स्थापन केली त्याचे नाव काय?

**यूथ सोसायटी फॉर फिल्म्स**

१७) श्री माताजींनी सहा-सात वर्षे वयात एका नाटकात काम केले. त्यांनी श्री कृष्णाची भूमिका केली. त्यावेळी प्रेक्षकानी प्रत्यक्ष श्रीकृष्णच अवतीर्ण झाल्यासारखे वाटल्याचे सांगितले.

१८) श्री माताजींना रशिया देशातील एका संस्थेने १९९३ साली सन्माननीय सदस्यत्व दिले त्या संस्थेचे नाव काय?

**''पेट्रॉव्हस्की ॲकॅडमी ऑफ आर्टस् ॲंड सायन्सेस सेंट पीटसबर्ग''**

या संस्थेस दिडशे वर्षाहून अधिक मोठी परंपरा असून आपल्या इतिहासात केवळ दहा जगप्रसिद्ध व्यक्तींना सन्माननीय सदस्यत्व या संस्थेने दिले आहे. श्री माताजींचे आधी ''आईनस्टाईन'' या जग प्रसिद्ध शास्त्रज्ञांना सन्माननीय सदस्यत्व दिले होते.

इटालियन सरकारने श्री माताजींना 'पर्सनॅलिटी ऑफ द इयर'' म्हणून १९८९ साली घोषित केले.

—

१९) सन १९९५ मध्ये रूमानियन विद्यापीठाने श्री माताजींना ''डॉक्टरेटची'' पदवी दिली तिचे नाव काय?

**''डॉक्टरेट इन कॉग्निटिव्ह सायन्सेस''**

२०) परम पूज्य श्री माताजी परमेश्वराच्या अवतार आहेत. यांस आंतरराष्ट्रीय किर्तीच्या शिया मुस्लीम नेत्याने मान्यता दिली आहे. त्या नेत्यांचे नाव काय?

**''अयोतुल्ल्हा मेहदी रुहानी''**

२१) गांधीजी श्री माताजींना 'नेपाळी' असे म्हणायचे त्याचे कारण?

**''श्री माताजी सीताजीं प्रमाणे दिसतात व सीताजी नेपाळी होत्या''**

२२) परम पूज्य श्री मातजी नागपूर येथे कॉलेजमध्ये असताना विद्यार्थ्यासमोर त्यांनी पोलिसांनी घातलेल्या बंदी हुकुमाचे उल्लंघन करून भाषण केले. त्या कॉलेजचे नांव व तो दिवस कोणता?

**''गव्हमेंट कॉलेड्रा''. दिवस ७ ऑगस्ट १९४२**

नंतर श्री माताजींनी लुधियाना व लाहोर येथील मेडीकल कॉलेजमधे वैद्यकीय शिक्षण घेतले.

२३) प. पू. श्री माताजींचा स्वातंत्र्य संग्रामात सक्रीय सहभाग होता. त्यांचे माता-पिता सुद्धा सहभागी झाल्याने त्यांना सहा वेळा कारावास सहन करावा लागला. श्री माताजींचे तरुण वय असल्याने श्री. विनोबा भावे यांनी श्री माताजींनी स्वातंत्र चळवळीत सहभागी होऊ नये असे सुचविले. परंतु त्यांच्या वडीलांनी त्यास मान्यता दिली नाही, उलट श्री माताजींना सहभाग चालू ठेवण्याबद्दल प्रोत्साहन दिले.

२४) प. पू. श्री माताजींचा विवाह दिवस कोणता?

**७ एप्रिल १९४७ दिल्ली येथे झाला.**

●●●

# विराट पूजा

**प. पू. श्री माताजी निर्मला देवी यांचे भाषण (सारांश)**
**कबेला : ५ सप्टेंबर ९९**

आज आपण श्रीकृष्णांच्या विराट स्वरूपाची पूजा करणार आहोत. श्रीकृष्णांच्या अवतरणाचे महत्त्व आपण समजून घ्यायला हवे. 'कृष्ण' या शब्दाचा संदर्भ 'कृषी' या शब्दाशी आहे. म्हणजे श्रीकृष्णांच्या अवतरणाचा उद्देश लोकांमध्ये अध्यात्मिक भावनेचे बीज पेरणे हा होता. त्याच्या आधीच्या श्रीरामांच्या अवतरणकाळी लोकांमध्ये 'मर्यादा' पाळण्याचा स्वभाव खोलवर रुजला होता; 'हे चांगले, ते करू नये' अशा प्रकारची वृत्ति बळावल्यामुळे एकंदरीत लोक गंभीर स्वभावाचे बनले. संवाद, हास्य, आनंद इ. अनुभवांपासून दुरावले आणि म्हणून श्रीकृष्णांना लोकांमधील हे कण्डिशनिंग दूर करून त्यांना आनंद मिळविण्याकडे प्रवृत्त करणे जरुरीचे वाटले. त्यासाठी त्यांनी तीन उपाय सांगितले. प्रथम लोकांना आत्मसाक्षात्कार मिळून लोभ, मोह, कण्डिशनिंग, अहंकार इ. विकारांपासून मुक्त होऊन ते **स्थितप्रज्ञ झाले पाहिजेत.** त्यामुळे ते पूर्णपणे निरासक्त होऊन त्यांच्यातील हेवा, द्वेष, अभिलाषा संपून जातील. अर्थात हे कसे मिळवायचे त्यांनी सांगितले नाही. दुसरी गोष्ट त्यांनी लोकांना सांगितली की सर्व काही कर्म करीत रहा पण त्याची **फलाशा सोडून ती मलाच अर्पण करा.** तिसरी गोष्ट म्हणजे पाने, फुले, पाणी कशानेही माझी पूजा केली तरी चालेल पण त्यामधे **अनन्य भक्ति ठेवा.** आता हे सर्व आत्मसाक्षात्कारानंतरच शक्य आहे. पण मनुष्य स्वभावच इतका विचित्र आहे की श्रीकृष्णांनी जे सांगितले त्यातील मर्म सोडून देऊन लोक पूजा-अर्चा, पंढरपूरची पायी वारी इ. प्रकारांनाच भक्ति वा धर्म समजू लागले व त्यातच अडकले. श्रीकृष्णांनी सांगितलेले हे तीन प्रकार म्हणजे त्यांची युक्ति होती कारण त्यांनी ओळखले होते आत्मसाक्षात्काराकडे याच मार्गाने लोक वळतील. आत्मसाक्षात्काराशिवाय कर्मफल-त्याग व अनन्य भक्ति अशक्य आहे. हेच त्यांचे कृषी-कार्य होते आणि त्यातूनच जमीन तयार करून बीज पेरण्याचे म्हणजे लोकांना अध्यात्माकडे नेण्याचे कार्य त्यांना अपेक्षित होते.

त्याबरोबरच स्थितप्रज्ञ स्थिति मिळवण्याचा ज्ञानयोग त्यांनी सांगितला. त्यासाठी परम-सत्य (Absolute Knowledge) मिळणे जरुर होते. सहजयोगातून तुम्हा लोकांना हातांवर जाणवणारे परमचैतन्य हेच सत्य आहे हे समजले आहे. याशिवाय त्यांनी विवेकाबद्दल सांगितले; त्यांना असेही जाणवले की वरील तीन प्रकारे भक्ति करताना लोकांच्या मनातील विवेक जागृत होऊन त्यांना समजेल की केवळ कर्मकाण्ड म्हणून भक्ति करून काही मिळणार नाही आणि आत्मसाक्षात्कार मिळवण्याची आवश्यकता त्यांना पटेल.

आजकाल सगळीकडे अत्यंत बिकट परिस्थिति निर्माण झाली आहे व जगाचा शेवट कसा होणार आहे याची लोकांना काळजी वाटत आहे. म्हणून चांगले-वाईट, योग्य-अयोग्य, हितकारक-विनाशक इ. गोष्टी समजण्यासाठी माणसांमधे विवेक जागृत झाला पाहिजे. पण मानवी बुद्धीतील विवेक व दैवी विवेक (Divine Descretion) यातला फरक तुम्ही समजून घेतला पाहिजे. दैवी विवेक हा योग्य वेळी जागृत होऊन कार्य करवणारा असतो. उदा. मी एकदा एक घर विकत घेण्याचा प्रयत्न करत होते आणि त्याचा मालक फार हालअपेष्टांत राहिलेला असल्यामुळे थोडी जास्त किंमत द्यावी असे वाटत होते; पण आम्ही किंमत सारखी वाढवत राहिलो तरी तो आणखी जास्त वाढवायला सांगत होता; हे चालू असतानाच मला एकदम जाणवले की या व्यवहारात अर्थ नाही आणि मी तो प्रश्न तिथेच थांबवला. हा विवेक म्हणजे Divine Descretion; तो जागृत असला तर तुम्ही चुकीची गोष्ट करणारच नाही. म्हणून हा दैवी विवेक समजला पाहिजे व त्याचा संदेश शंका न घेता, तर्क-वितर्क न करता मान्य केला पाहिजे. कारण त्यामधे आपले अंतिम हीतच असते. सहजयोगामधून हे सहजसाध्य आहे अणि त्यामधेच आपल्या आत्म्याचे समाधान आहे.

श्रीकृष्णांना लोकांनी आनंदी असावे असे वाटत असल्यामुळे त्यांनी नृत्य, रास, संगीत इ. कलांना प्रोत्साहन देऊन लोकांच्या मनात त्याची आवड निर्माण केली; त्यामधून लोकांना आनंदाचा अनुभव मिळून जीवनाबद्दल त्यांची अभिरुचि त्यांना बदलायची होती. यामधे काही करायचे असे नसून केवळ आनंदी वातावरण निर्माण करण्याचा त्यांचा उद्देश होता. हे सहजरीत्या घडून येत असते. सहजयोगामधेही तुम्ही ही स्थिति मिळवता. त्या काळी धार्मिक प्रवृत्ति म्हणजे धीर-गंभीर स्वभाव असा समज होता. श्रीकृष्णांना सहजधर्म अपेक्षित होता; पण संन्यास, घरदार टाकून देणे असल्या कल्पनांबद्दल ते कधीही बोलले नाहीत; उलट निरासक्त राहून आनंद मिळवावा हाच त्यांचा उद्देश होता. कसल्याही प्रकारची आसक्ति मनात बाळगून तुम्ही निखळ आनंद मिळवू शकत

नाही. उदा. लहान मुलांना हे करू नको, ते करू नको, असंच रहा असे निर्बंध घालून त्यांच्या मागे लागण्याची जरुरी नाही. त्यापेक्षा दैवी विवेक वापरला तर मुलाने काय करावे, काय करू नये हे तुम्हाला नीट समजते व त्यानुसार तुम्ही त्यांच्याशी वागू शकता. याचाच अर्थ हा की कोणत्याही व्यक्ती व घटनेपासून तुम्ही अलग वा दूर राहिल्याशिवाय तुमच्यातील दैवी विवेक जागृत होत नाही व ती व्यक्ति वा घटना तुम्ही नीट समजू शकत नाही. आसक्ति तुम्हाला एक प्रकारचे समाधान देऊ शकेल, पण आनंद देऊ शकणार नाही. आनंदाला दुसरा अन्वयार्थी (उलट) शब्दच नाही, तो सर्वसमावेशक अनुभव असतो व त्याला पर्याय नसतो.

म्हणून श्रीकृष्णांना मर्यादांच्या आडकाठीमधून लोकांना बाहेर काढायचे होते. मर्यादा म्हटले की एक प्रकारचा संकुचितपणा येतो, त्याच्याशिवाय दुसरा दृष्टिकोन माणूस लक्षात घ्यायला तयार नसतो. त्याच्या स्वभावात असा उदारपणा नसतो. त्यामुळे एक प्रकारचा मानसिक बंदिस्तपणा स्वभावात येतो. सहजयोगात नवीन आलेल्या लोकांनाही धर्माबद्दलच्या त्यांच्या मर्यादा आड येतात. उदा. इस्लाम धर्माच्या लोकांना स्वतंत्र इस्लाम राष्ट्र हवे असते, याला देशभावनेच्या मर्यादा म्हणता येतील. त्याच्या उलट प्रकार म्हणजे पाश्चात्य महिलांना आजकाल कमीत कमी कपडे घालण्यात काही संकोच वाटत नाही. मर्यादा नको म्हणजे काय वाट्टेल ते करायला मोकळीक असाही अर्थ अभिप्रेत नाही. म्हणजेच जीवनामध्ये विवेक असला पाहिजे. त्याशिवाय योग-अयोग्य, चांगले-वाईट हा फरक प्रत्यक्षात समजणार नाही. त्याचबरोबर सहजयोगी झाल्यावर हा अमेरिकन, हा भारतीय इ. प्रकारच्या देशा-देशांच्या मर्यादाही सुटल्या पाहिजेत. तुम्ही जगाचे, म्हणजे सगळ्या देशांचे रहिवासी होता, भाषा, पद्धती वेगवेगळ्या असल्या तरी तुम्ही एकमेकामध्ये मिसळून जाता. कुठल्या एका देशाचे असे विशिष्ट नागरिक न राहता साऱ्या जगाचे नागरिक बनता. म्हणूनच तुम्ही कुठेही जाऊन सहजयोगाचे कार्य करण्यास तयार राहिले पाहिजे. देशादेशांमधील भेद पाळल्यामुळेच आक्रमण करून दुसऱ्यांची भूमि बळकावण्याची, तेथील रहिवाशांना निर्वासित म्हणून हाकलून देण्याची प्रवृत्ति वाढून प्रश्न निर्माण झाले. खरे तर असे झगडे व युद्ध व्हायला नको. पण सत्य मिळवण्यासाठी तुम्हाला अशा विरोधी शक्तींचा समाचार घेण्यासाठी सिद्ध झाले पाहिजे. अर्जुनाला अधर्मी कौरवांबरोबर युद्ध करण्यासाठी संकोच न बाळगण्याचा उपदेश म्हणूनच श्रीकृष्णांना द्यावा लागला. हाच श्रीकृष्णांचा दैवी विवेक.

आपल्या सहजयोग्यांचा धर्म हा विश्वधर्म आहे. जगामधे कुठेही गेलात तरी तुम्हाला सहजयोगी भेटतील व प्रेमभराने तुमची सर्व व्यवस्था करतील. दैवी विवेक ही श्रीकृष्णांची कृपा व आशीर्वाद आहेत. श्रीकृष्ण विशुद्धी चक्रावर आहेत पण सहस्त्रारात ते विराट बनतात. कुण्डलिनी आज्ञा चक्र पार करून सहस्त्रारात आली की तुम्ही विराटांच्या क्षेत्रामध्ये येता आणि त्यांचेचे अंश बनता. विराट शक्ति ही प्रचंड, महान शक्ति आहे. अर्जुनाला तिचे दर्शन विश्वरुपात झाले आणि ती शक्ति जगभर कुठेही कार्य करू शकते. इथे बसून तुम्ही जगातील कुठल्याही व्यक्तीकडे वा समस्येकडे चित्त लावले की ते कार्य घडून येणारच. सहजयोग्यांनी त्याचे अनेक चमत्कार अनुभवले आहेत. सर्वव्यापी शक्तीबरोबर आपण जोडले गेलो की ही विराट-शक्ति सूक्ष्मातिसूक्ष्म वस्तूमधे प्रवेश करू शकते. सागरातील एक बिंदू संपूर्ण सागरसमान होतो. म्हणून विराटांच्या साम्राज्यात आल्यावर तुमची व्हायब्रेशन्सही कितीही दूर पोचू शकतात. तुमचे विचार, संकल्पना दूरदूर पोचून कार्य घडवून आणतात. म्हणून विराटांची पूजा कशी करायची हे तुम्ही लक्षात घेतले पाहिजे.

तुम्ही अहंकारावर पूर्ण ताबा मिळवून आज्ञा-चक्र पार करून पुढे गेल्यावरच तुमचा विराटांच्या साम्राज्यात प्रवेश होतो. मग ही विराट शक्तीच तुमचा पूर्ण तऱ्हेने सांभाळ करते. ही शक्ति विश्वभर कार्य करू शकते. तुम्ही स्वतः विश्वव्यापी बनल्यासारखे, आहात तिथूनच, दूरवरचे संघर्ष मिटवू शकाल. तुमची करूणा आणि तुमचे चित्त इतके कार्यान्वित होऊन जाते की तुम्ही मनात आणाल ते घटित होईल. या स्थितीमध्ये तुमच्यातील 'मी' आणि 'माझे' हे सर्व संपलेले असते. मग तीच विराटशक्ति तुमच्याकडून जागतिक स्तरावर कार्य घडवून आणते. तुमचे विचार सर्व जगाच्या, सर्व मानव जातीच्या दृष्टीने कार्य करतात. त्यावेळी तुम्हाला नसुते पाहिले तरी लोकांना तुमची महानता जाणवेल आणि म्हणून घोषणा करण्याची जरूर राहणार नाही. मग तुम्ही अधिकार, पैसा, प्रतिष्ठा, कौटुंबिक श्रेष्ठता इ. सर्व बाबतीत निरीच्छ होता. त्याचे महत्त्व तुम्हाला वाटेनासे होते. या सर्व भौतिक मोठेपणातून आपला अहंकारच बळावतो हे तुम्हाला समजते. अशी व्यक्ति विराटांच्या साम्राज्यात येते तेव्हा आपण किती लहान आहोत हे ओळखले आणि त्या विराट-सागरात विरघळून जाते. आपण सर्वांनी ही स्थिति मिळवली पाहिजे म्हणजेच विराटांच्या साम्राज्याचे नागरिक बनले पाहिजे.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

●●●

# सहज समाचार

पुण्यामधील कारागृहामध्ये सहजयोग सुरू करण्याबद्दल प्रयत्न चालले होते. त्यासाठी पुण्यामधील कारागृहामध्ये तेथील कर्मचाऱ्यांसाठी ऑगस्ट१९९९ मध्ये एक कार्यक्रमही झाला. प. पू. श्री माताजींच्या कृपेने कारागृह महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून महाराष्ट्रातील सर्व कारागृहांमधील कैद्यांना व कर्मचाऱ्यांना सहजयोग कार्यक्रम आयोजित करण्यासाठी अधिकृत परवानगी मिळाली आहे. त्या पत्राची कॉपी इथे केली आहेच.

पुण्यातील कारागृहात नोव्हेंबर ९९ पासून कार्यक्रम होण्यास सुरुवात झाली आहे. सध्या १००/१५० कैद्यांना )तपदका बायब्रूझ सहजयोग सांगून त्यांचे रोज ध्यान घेतले जात आहे.

---

३१ ऑक्टोबर ९९ रोजी पुणे केंद्रातर्फे बालकृष्ण मंगल कार्यालय, थेरगाव, चिंचवड इथे सहजयोग सेमिनार घेण्यात आला. परगावच्या केंद्रांनाही सूचना असल्यामुळे

इ. ठिकाणांहून अंदाजे ३५० सहजयोगी सेमिनारसाठी आले होते. पुण्यातील सहजयोगी अर्थात होतेच; एकूण उपस्थिती अंदाजे ७५० होती. प्रथम पूजा केली गेली. भोजनपश्चात श्री. योगी महाजन यांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. संध्याकाळनंतर रात्री उशीरापर्यंत संगीताचा कार्यक्रम झाला; त्यात युवा-शक्ती, म्यूझिक ग्रुप, मुले व इतर सहजयोगी कलाकारांनी उत्साहाने भाग घेतला व कार्यक्रमाची रंगत वाढवली. दुसरे दिवशी सकाळचे ध्यान होऊन सेमिनारची समाप्ति झाली.

---

## सांगली केंद्रातर्फे साखर कारखान्यावर सार्वजनिक कार्यक्रम

प. पू. श्री. माताजींच्या कृपेत वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना, सांगली येथे कारखान्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी सार्वजनिक कार्यक्रम झाला. यावेळी प्रा. अशोक चव्हाण सर यांनी उपस्थितांना सहजयोगाची ओळख करून दिली. यावेळी उपस्थित १५०० पेक्षा जास्त साधकांना चैतन्याची जाणीव झाली. या ठिकाणी दर शनिवारी सायंकाळी साखर कारखान्यावरील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी केंद्र सुरू झाले आहे. अंकाच्या मागील पानावर फोटो दिलेले आहेत.

* * *

# सहज समाचार

पत्र

जा. क्र. संशोधन/सहजयोग/कारोमका/१९९९/
६३-५[७].
कारागृह महानिरीक्षणालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००१.
दिनांक :- २६ ऑक्टोबर, १९९९.

प्रति,

श्री. के. जे. ठाकूर,
ॲडव्होकेट,
फ्लॅट नं. १ गणेश चेंबर्स,
उर्मिला हाऊसिंग सोसायटी, धनकवडी,
पुणे - ४११ ०४३. [फोन - ४७६२२७]

विषय :- कारागृहातील बंदी व कर्मचारी-यांसाठी "सहजयोगा" चे शिबीर घेण्यास परवानगीबाबत.....

संदर्भ :- आपले पत्र क्रमांक सीएस्डी/एल/१०५/९९-२०००,..
दिनांक ५/८/१९९९.......

उपरोक्त विषयावरील संदर्भित पत्रान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्रातील सर्व कारागृहातील बंदींना व कर्मचारी-यांना पूज्य श्री. माताजी निर्मलादेवी प्रणीत "सहजयोगा" चे शिबीर विनामूल्य घेण्यास या पत्राद्वारे आपणास परवानगी देण्यात येत आहे.

या शिबीरासंबंधी तारीख व वेळ निश्चित करण्यासाठी आपण संबंधित कारागृह अधीक्षकांशी संपर्क साधून कार्यक्रम आयोजित करावा.

आदेशान्वये

[मा. का. म. नि. यांचे मान्यतेने] [ डी. जे. वेट्टीकुन्नेल ]
संशोधन अधिकारी,
कारागृह महानिरीक्षणालय, म. राज्य, पुणे-४११००१.

प्रत :- [१] सर्व कारागृह उपमहानिरीक्षक.
[२] सर्व कारागृह अधीक्षक.

वाएच/१४१०. -x-x-x-x-

# ऑल रशिया सायंटिफिक परिषद

प. पू. श्री माताजी निर्मला देवींचे भाषण
रशिया : जून ९८

सेंट पीटसबर्ग येथे १ ते १० जून ९८ या काळात ''ऑल रशिया सायंटिफिक व प्रॅक्टिकल कॉन्फरन्स झाली. 'आरोग्य, शांती, नीति व संस्कृतिः पूर्व व पश्चिम' असे त्याचे स्वरूप होते. या परिषदेला देशोदेशांतील अनेक वैज्ञानिक तसेच समाजशास्त्र, अर्थशास्त्र संख्याशास्त्र, शिक्षण इ. विषयांतील अनेक तज्ञ मंडळी सहभागी झाले होते. या प्रतिष्ठित परिषदेत प. पू. श्री माताजींनी केलेल्या भाषणाचा सारांशः

सत्याच्या शोधकांना माझा नमस्कार. सध्याचा काळ विशेष असून त्यास मी बहारीचा काळ म्हणते. आपल्या सभोवतालची फुले पहा, तशीच सत्याचा शोध घेण्यास मानवी फुले आली आहेत. ते युगानुयुगे सत्याच्या शोधात होते. सध्याच्या या विशेष काळात आपल्या ध्येयाप्रत जाण्यासाठी ते लोक पुन्हा आले आहेत. काय शोधावयाचे ते न समजल्याने अनेक जण हरवले. विज्ञानसुद्धा शोध घेत आहे पण विज्ञानाचा शोध मर्यादित क्षेत्रात आहे. कारण विज्ञान विभाजित (डायव्हर्सिफाइड) झाले आहे. कोणी फिजिक्स कोणी मेडीकल सायन्स व इतर असेच प्रत्येक जण आपापल्या विषयात सत्याचा शोध घेत आहे आणि विविध प्रकारात विज्ञानाचे विभाजन होत आहे.

परंतु सत्य निराळे आहे. सत्याच्या क्षेत्रात शोध घ्यायचा असल्यास सर्वात प्रथम आपल्यात नम्रपणा येणे आवश्यक आहे, की आतापर्यंत आपल्याला सत्य गवसले नाही. आपल्याला सत्य समजले आहे असे वाटत असल्यास कोणीच तुमच्यावर ते लादू शकत नाही, पण तुम्ही नम्रपणे हे लक्षात घ्यावे की तुम्हाला सत्य समजले नाही. तसेच सत्य जाणण्याची आपल्याला अत्यंत शुद्ध इच्छा असावी. हा विशेष काळ आहे असे मी म्हणाले कारण अनेक सत्याचे शोधक जन्मले असून ज्याचा शोध ते घेत आहेत, ते सत्य त्यांना मिळायला हवे. सत्याच्या विषयी अनेक सिद्धान्त आतापर्यंत प्रचलित आहेत. पण वास्तविक सत्य समजले आहे असे कधी झाले नाही. त्यामुळे त्या सिद्धांताला सुद्धा फाटे फुटले आहेत. काही जण म्हणाले हा धर्म चांगला आहे तर दुसरे म्हणाले, तो चांगला आह. अशाप्रकारचे अनेक फाटे फुटले.

शिवाय विज्ञान नैतिकताविरहित (amoral) असून विज्ञान व अबाधित सत्य यांची सांगड केव्हाच घातली गेली नाही. पण सत्य एकच आहे. ते एकटेच आहे व त्यात बदल होऊ शकत नाही. विज्ञान निराबाधित नाही. त्याला सतत आव्हाने मिळतात. पण मुख्य गोष्ट अशी की निराबाधित सत्यच वास्तवात उतरते.. जसे केमिस्ट्रिमधे पिरियॉडिक लॉ वास्तव आहे तसेच फिजिक्समधेही आहे.

तेव्हा सत्याचा शोध अशा अवस्थेला जेव्हा पोहोचतो की त्या वेळी सत्य प्रत्यक्षात उतरते त्या वेळी ते निराबाधित सत्यच उतरते. तेव्हा निराबाधित सत्य कोणते? मी तुम्हाला सिद्धान्त देऊ शकते. पण तो सिद्ध करावा लागेल. एक प्रकारे ते आधुनिक विज्ञानाच्या क्षेत्राच्या पलिकडे जाते. पण ते निराबाधित विज्ञान (Absolute science) आहे. त्याला आव्हान देता येत नाही.

जर मी म्हणाले हा सिद्धान्त आहे तर मी त्याची सिद्धता करू शकते. आपल्याला स्वतः संबंधी विशेष ज्ञान नाही. आपल्याला दुर्धर आजार का होतात याचे कारण समजत नाही. लोकांना स्किझोफ्रीनिया होऊन वेड का लागते ते आपल्या माहिती नाही. आपल्यामधील जीन्स का आहेत व त्यात कसा बदल करता येईल हे आपण जाणत नाही. अशा अनेक गोष्टी मला सांगता येतील पण आता मी तुम्हाला मुख्यत्वे निराबाधित सत्याचा सिद्धान्त सांगणार आहे. त्यासाठी कोणत्याही विद्यापीठाच्या पदवीची आवश्यकता नाही अथवा काही मोठेपण नको की कर्मकांडे नको, इतके ते सोपे आहे, कारण ते अत्यावश्यक आहे. आपण श्वास घेतो पण आपल्याला कोणी शिकवले नाही की कसा श्वास घ्यायचा. पण आपण ते जाणतो. इतके ते अटळ आहे. सत्य समजण्याची वेळ आली आहे. ते सत्य असे की आपण शरीर, मन, अहंकार, भावना वगैरे काही नसून आपण शुद्ध आत्मा आहोत. शास्त्रज्ञ याला आव्हान देतील व त्यांनी द्यावे. कारण आत्मा आपल्याला सूक्ष्म दर्शकाखाली पहात येत नाही. तेव्हा तुम्ही आत्मा आहात हे मी सांगत आहे हे वास्तव आहे. हे तुमच्या अंतर्यामी घटित व्हावयास पाहिजे. मग हे आत्म्याचे विज्ञान आहे हे वैज्ञानिकांनी मान्य करावयास हवे.

आता मी म्हणते की आपण मानव आहोत पण आपण अद्याप Absolute (निराबाधीत) पातळीपर्यंत आलो नाही.

Absolute पातळी असती तर प्रत्येकाचे ज्ञान एकच असते. पण ते तसे नाही. प्रत्येकाचे वेगळे विचार असतात आणि एखाद्या तत्वास मान्यता देण्याऐवजी लोक त्याच्यावर भांडणे करतात. त्याठी चर्चा होतात, परिषदा भरतात पण हे असे आहे की ते तुमच्यामधे घटित व्हायला पाहिजे. तुम्हाला घडावे लागते.

उदाहरणार्थ अनेक दिवे आपण पहातो व आपल्याला हे माहिती आहे की मुख्य प्रवाहाशी जोडल्याशिवाय त्यांना अर्थ नाही. त्याचप्रकारे मला हे सांगायचे आहे की आपल्याला प्रेमाच्या सागराशी संलग्न व्हायचे आहे. आता ज्याला मी म्हटले की परमेश्वरी प्रेमाची शक्ति ते काय आहे? अनेक रंगाची व सुंगध असलेली फुले आपण पहातो. डॉक्टरांना विचारले की हृदयाचे कार्य कोण चालवितो? तर ते सांगतील ऑटोनॉमिक नर्व्हस सिस्टिम. पण त्यातील ऑटो काय आहे? त्यांच्याकडे याचे उत्तर नाही व प्रामाणिक असल्याने ते सांगतील की आम्हाला माहिती नाही. शुद्ध ज्ञान मिळविण्यासाठी ज्ञानाच्या परिघाच्या बाहेर आपल्याला गेले पाहिजे. त्याला मी अत्याधुनिकतम शोध असे म्हणते.

अनेक संतांनी व अवतरांनी सांगितले आहे की तुम्ही आत्मा आहात. यात नवीन काही नाही. परंतु वैज्ञानिकांना नेहमीच असे वाटत आले आहे की संततत्वाचा, अध्यात्माचा व त्यांचा काही संबंध नाही. तुम्ही शास्त्रज्ञ, तत्वज्ञ, कवि अथवा राजकारणी कोणीही असा तुम्ही केवळ शुद्ध आत्मा आहात. तुम्ही कोणत्याही गोष्टीला सत्य समजा. निराबाधित सत्य (absolute truth) जाणून घेण्याची शुद्ध इच्छा तुमच्याकडे असावी. यासाठी आपल्याला निर्माण करणाऱ्याने (परमेश्वराने) आश्चर्य वाटेल असे काम केले आहे. त्याने आपल्यामधील माकड हाडामधे (सॅक्रम बोन- Sacrum bone) एक विशेष शक्ति ठेवली आहे. ग्रीक देशातील लोकांना सुद्धा या अस्थीच्या पावित्र्याविषयी माहिती होती. पण ते भरकटले. पवित्र अस्थीमधील शक्ती वास्तविक त्या ठिकाणी आहे. तुम्ही ते तपासून पाहू शकता. केवळ मी सांगते म्हणून तुम्ही विश्वास ठेवावा असे नाही. तुम्ही त्याचा पडताळा घ्या. तसेच परमेश्वरी प्रेमाची सर्वव्यापी शक्ति आहे की नाही याचाही पडताळा घ्या. त्याचेसाठी त्रिकोणाकृती माकड हाडात वलये घालून राहिलेल्या शक्तीचे उत्थापन करावयास हवे. त्या शक्तिने सात शक्ति-केंद्रांमधून वर जाऊन टाळूचे भेदन करून सर्वव्यापी शक्तिशी संलग्न व्हावे लागते. एकदा हे घटित झाले की ही सर्व केंद्रे एकात्मतेने कार्य करीत असल्याने आपण पूर्ण समग्र होतो.

आपल्यातील ही शक्ति केंद्रे आपल्या शारीरिक, बौद्धिक, भावनिक व अध्यात्मिक अंगांचा संभाळ करीत असल्याने एकदा उपरोक्त शक्ति जागृत झाली की ती व्यक्ति अध्यात्मिक होते. याचा अर्थ आपल्या चित्तात आत्मा प्रकाशित होऊन आपल्याला निराबाधित सत्य (absolute truth) समजते. तुमच्या तळहाताच्या बोटांवर ते समजते कुराणात महंमद साहेबांनी स्पष्ट सांगितले आहे की तुमच्या पुनरुत्थानाच्या वेळी तुमचे हात तुमच्या विरोधात बोलतील. तुमच्यातील दोष तुम्हाला दाखवतील. पुन्हा मी आपल्याला सांगते की हे सर्व पडताळून बघा. तुमची कुंडलिनी शक्ति जागृत झाली व तुम्ही सर्वव्यापी प्रेमशक्तीशी संलग्न झाला तर तुमच्या हातावर शीतल चैतन्य लहरी जाणवू लागतील. तुम्हाला जाणिवेतील निर्विचार अवस्थेचा अनुभव येतो. आपल्या मनाच्या द्वारे आपण भूतकाळात अथवा भविष्यकाळात रहातो. आपण भूतकाळात असतो तेव्हा, त्यास अस्तित्व नसते. कारण ते सर्व होऊन गेलेले असते. भविष्यकाळ अस्तित्वातच नसतो. वर्तमान हेच सत्य असते. म्हणून वर्तमानात आपले विचार आपल्याला विचलित करीत नाहीत व आपण अजूनच शांत होतो. पहिली गोष्ट ही होते की व्यक्ति अतिशय शांत स्वभावाची होते. स्पर्धा, भांडणे, हिंसाचार वगैरे काही नाही. शिवाय ही शांति समोरच्या माणसापर्यंत सुद्धा जाते. आपल्या अंतरंगाचे हे विज्ञान सर्व लोकांमधे आहे पण आपल्याला त्याची जाणीव नसते.

आत्यंतिक शांतपणा आल्यावर भांडणे, युद्ध इत्यादी होणार नाही. हे असंख्यांच्या पातळीवर (mass scale) घडून आल्यास संपूर्ण मानव जातीची मुक्तता साधता येईल व अध्यात्मिक लोक या स्वरुपात त्यांना स्वतःचे मोल समजेल. वर सांगितलेली शक्ति केंद्रे प्रकाशित झाल्याने लोक रोगमुक्त होतील.

आता आपली बुद्धी कायम विचार करीत असते. त्याचा आपल्यावर जणु काही भडिमार होत असतो. त्याच्यामुळे आपण अगदी दुःखी, कष्टी होतो, थकून जातो व एका विचित्र परिस्थितीत सापडतो. स्क्रिझोफ्रिनियाचा आजार या मधून निर्माण होऊ शकतो. एक नवीन व्याधी दिसून येते ती म्हणजे अल्झमेर. या व्याधीने पीडित व्यक्तीचे जीवन आपण पाहिले तर असे लक्षात येईल की ती व्यक्ति अतिशय आक्रमक स्वभावाची असते. त्याने लोकांना त्रास दिला असेल, स्वतःला फार महान समजून इतरांशी भांडणे केली असतील. एकदा आपण परमेश्वराच्या सर्वव्यापी प्रेम-शक्तीशी संलग्न झालो की आपल्याला हया सर्वांचा उलगडा होतो. ही परमेश्वरी शक्तीच सर्व कार्य करते. जसे आपल्या हृदयाचे कार्य चालते. आपले शरीर कोणतीच बाहेरची गोष्ट स्वीकारत नाही. पण एकदा

गर्भ तयार झाल्यावर शरीर त्याला स्वीकारते व त्याचे संगोपन करून योग्य क्षणी त्यास बाहेर ढकलते. हे सर्व कार्य करण्यास, शरीराला कोण मार्गदर्शन करते ते आपल्याला समजत नाही. अनेक शास्त्रज्ञ हे मान्य करतात की पुष्कळ गोष्टींचे स्पष्टीकरण देता येत नाही. याचे कारण आपण आपल्या अंतिम स्थितीस (डेस्टिनेशन) प्राप्त केले नाही.

एकदा आपण हे डेस्टिनेशन गाठले की तुम्हालाच आश्चर्य वाटेल की परेमश्वरी प्रेमाने आपल्याला एक विशेष व्यक्ती बनविले आहे. इतरांना आपण प्रेम, शांति देऊ शकतो. त्यांना रोगमुक्त करू शकतो. आपण सृजनशील होतो. चार्टर्ड अकौंटटच्या रुक्ष व्यवसायातील एक जण उत्तम कवि झालेले मी पाहिले आहेत. भारतातील अनेक मोठे गायक, वादक, कलाकार सहजयोगी आहेत. तसेच अनेक सुफी संतांनी व इतर संतांनी केलेल्या गूढ वाटणाऱ्या काव्य रचना आपल्याला समजू शकतात. तुम्ही शक्तिशाली होता. पण ही परमेश्वरी शक्ति जुलुम जबरदस्ती करीत नाही. उलट ती तुमच्यावर प्रेम करते. तुमची सर्व काळजी करते. दुसरी एक शक्ति तुम्हाला मिळते, ती म्हणजे तुम्हाला सामूहिक चेतना मिळते. आमच्या प्राध्यापकांनी तुम्हाला सांगितले की आपण एक आहोत, विभक्त नाही. ते खरे आहे पण त्यासाठी तुम्हाला घटित व्हावे लागते. एकदा तुम्ही ते झालात की ती एकाकारिता तुमच्या लक्षात येईल. प्रत्येकाच्या हृदयात ईशरत्व प्रकाशमान आहे. पण ईश्वराचे हे अंग तुमच्या चित्तात यायला पाहिजे. जेव्हा ते चित्तात येते तेव्हा चित्त प्रकाशित होते. मग केवळ दुसऱ्याकडे चित्त देऊन तुम्ही त्याला मदत करू शकता. कोणत्याही देशाकडे चित्त दिले तर तुम्हास त्यांना मदत करता येईल. तुमचे चित्त एवढे शक्तिशाली होते.

रशिया हा एक विशेष देश आहे असे म्हणायला हवे. तुम्हाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते हे मला माहिती आहे. पण त्याच्यामुळे तुमचे बावनकशी सोने झाले आहे. या देशातील लोक व शास्त्रज्ञ किती खुल्या हृदयाचे आहेत! इतक्या खुल्या हृदयाचे वैज्ञानिक मी जगात कोठेच पाहिले नाहीत. अर्थात इतर देशातही काहीजण आहेत. परंतु या ठिकाणीच पदार्थ विज्ञानातील शास्त्रज्ञ मोठ्या संख्येने आध्यात्मिक शास्त्रज्ञ झाले आहेत. या सामूहिक चेतेनमुळे तुम्हाला दुसऱ्याची केंद्रेही जाणवतात. स्वतःची केंद्रेही आत्मज्ञानामुळे समजतातच आणि स्वतःवर उपचार करणे तुम्हाला जमले तर दुसऱ्यावरही उपचार करू शकता. येथे बसूनही तुम्हाला समजेल.

तुम्ही सायन्सचा अभ्यास करता तसा याचा करण्याची आवश्यकता नाही. मी सुद्धा विज्ञानाचा व मेडिकल सायन्सचा अभ्यास केला आहे. कारण वैज्ञानिक आणि डॉक्टरांशी चर्चा करावी लागेल हे माझ्या लक्षात आले होते. आणि हे सर्व तुमच्या महान देशामध्ये घटित झाले आहे. एवढे उच्च शिक्षित व उच्च पदस्थ लोक इतक्या नम्रतेने या सर्व ज्ञानाचा स्वीकार करीतआहेत. या ज्ञानासाठी कोणतीही किंमत देता येत नाही. ही तुमच्या उत्क्रांतीची नैसर्गिक प्रक्रिया (प्रोसेस) आहे. यापूर्वी तुम्ही सर्वसाधारण माणसे होता, आता अध्यात्मिक मानव झाले आहात.

याच्यामुळे तुमचे जीवन पूर्णतया बदलून जाईल. तुम्ही आतूनच शांत होऊन सर्वच गोष्टी एखादे नाटक पहावे त्याप्रमाणे साक्षी भावाने बघाल. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे तुम्ही आनंदी व्हाल. आनंद या शब्दास विरोधी शब्द नाही. दुःख हा सुखाचा विरोधी शब्द आहे. तुम्ही दुसऱ्यावर टीका करीत नाही, की त्यांच्यातील दोष दाखवत नाही. उलट कोणत्याही गोष्टीचा अतिरेक करणाऱ्यांचे व निरर्थकपणाचे (absurdities) आपल्याला हसू येते.

आता सध्याच्या काळात आपल्याला दिसेल की काही लोकांची वर्तणुक पशूंपेक्षाही खालच्या दर्जाची असते. पशूपेक्षाही ते वाईट असतात. काही गोष्टी ज्या ते लोक करतात ते पशुही करणार नाहीत. शिवाय अमली पदार्थांच्या (Drugs)व्यसनाधीनतचे प्रश्न आहतच. बौद्धिक पातळीवर समजावून ते ऐकणार नाहीत. पण आत्मसाक्षात्कारानंतर ते इतके भारदस्त होतात व त्यांना सर्व विक्षिप्त (रिडिक्युलस) प्रकार लगेच लक्षात येतो. इंग्लंडमध्ये काही तरुणांनी एका राहून आपली ड्रगची व्यसने सोडली. एका रात्रीत ते बदलले. तेव्हा हा संक्रमणाचा, पुनरुत्थानाचा काळ आहे. त्यासाठी बाह्यातून काही करावयास नको. तुमच्या आतमध्येच ते कार्यान्वित होईल. ते प्राप्त होणे हा तुमचा अधिकार आहे. या फुलांना ज्याप्रमाणे उमलण्याचा व सुगंध पसरविण्याचा अधिकार आहे तसा तुम्हाला आत्मबोधित होण्याचा हक्क आहे. मी त्याचेसाठी काहीच करीत नाही. माझे तुमच्यावर प्रेम आहे. विशेषतः रशियावर आहे. कारण तुम्ही तसे लोक आहात. तुम्ही मला आईप्रमाणे मान देता व मुलांप्रमाणे तुमच्यावर माझे प्रेम आहे. लक्षावधी मुले असलेल्या आईच्या भावना पूर्णपणे व्यक्त करता येत नाहीत. पण ते वास्तव आहे. आणि तुम्हाला आणि मला शक्तिदायी आहे. यात प्रेमाची तन्मयता आहे. मी वाद घालीत नाही की भांडणे करीत नाही. हे सर्व घटित होते. ही ईश्वरी शक्ति किती शक्तिशाली आहे; तुमच्या लक्षात येणार नाही, की ती सर्व कार्य कसे घडवून आणते. सर्व विरोधी आक्रमकता गळून पडते. जीवन सुरळीत होत व तुम्ही समाधानी जीव होता.

उपरोक्त परिषदेत अनेक विषयांवरील सहजयोगावर आधारित व सहजयोग साधनेच्या उपयुक्ततेवरील निबंधांचे वाचन झाले. त्यात पदार्थ विज्ञान (Physics) वैद्यक शास्त्र या विषयांबरोबर समाजशास्त्र व अर्थशास्त्र यांचाही समावेश होता.

(1) डॉ. आर बेरेस्नेव्ह व डॉ. व्ही. गोस्तीव्ह या वैद्यकीय डॉक्टरांनी 1995 साली 1792 व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. त्याचे निष्कर्ष खाली दिले आहेत.

– सहजयोग साधना करण्यापूर्वी 70 % लोकांना आजार होता.

– सहजयोग साधना करणाऱ्यांपैकी ८६% लोकांनी आरोग्यात सुधारणा झाल्याचे सांगितले.

– आरोग्यात सुधारणा होत असतानाच लोकांच्या मानसिक आरोग्यातही सुधारणा दिसून आली. सहजयोग साधना करण्यापूर्वी 41.2 % लोकांना नैराश्य (depression) चा त्रास होता पण सहजयोग साधना केल्यानंतर क्वचितच कोणाला तरी असा त्रास झाला.

– सहजयोग साधना करण्याने मद्यपान व धूम्रपान इत्यादी व्यसने मोठ्या प्रमाणावर कमी झाली.

(2) 1996 साली सायंटिफिक रिसर्च इन्स्टिट्युट ऑफ सोशल हायजीन, इकॉनॉमि ॲन्ड हेल्थ प्रोटेक्शन या संस्थेने मॉस्को शहर व त्याच्या परिसरातील 358 लोकांच्या मुलाखती घेतल्या. त्यांच्यापैकी 271 लोक सहजयोग साधना करीत होते.

– सहजयोग साधना करीत नसलेल्या केवळ 16.2 % लोकांनी आपली प्रकृति उत्तम असल्याचे सांगितले तर 57.2% सहज योग्यांनी आपल्या उत्तम प्रकृतिची ग्वाही दिली.

– सहजयोग साधना न करणाऱ्यांपैकी 74.4 % लोकांनी आपली प्रकृति वाईट असल्याचे सांगितले तर सहजयोग सुरू केलेल्या लोकांपैकी 70 % लोकांनी प्रकृति सुधारण्यासाठी सहजयोग घेतल्याचे सांगितले. सहजयोग साधनेमुळे आंतरिक शक्ति कार्यान्वित होऊन अध्यात्मिक संतुलन प्रस्थापित होते व त्याच्यामुळे अध्यात्मिक प्राप्ति होत असताना आरोग्य सुधारते.

– 96.5 % सहजयोग्यांनी जीवनात अध्यात्मिक उन्नतिस सर्वाधिक महत्त्व देत असल्याचे सांगितले. इतरांपैकी 75 % लोकांनी उत्तम आरोग्यास व 46.7 % लोकांनी भौतिक संपन्नतेस महत्त्वाचे स्थान देत असल्याचे सांगितले.

– सहजयोग्यांपैकी 87.5 % लोकांनी आपण जीवनात समाधानी असल्याचे सांगितले. तर इतरेजनात असे सांगणारे केवळ 39.7 % लोक आहेत.

– 69.3 % सहज योग्यांना कधी एकटेपण वाटत नसल्याचे तर केवळ 34.2 % इतर लोकांनी एकटेपण जाणवत नसल्याचे सांगितले.

वरील सर्व्हे शिवाय मॉस्को शहरातील 30-60 वर्षे वयोगटातील स्त्रियांच्या दोन ग्रुप्सचे सर्व्हे घेण्यात आले. त्यांच्यात सहजयोग करणाऱ्या व न करणाऱ्या महिला होत्या. त्या सर्व्हेच्या विश्लेषणात तसे आढळले की सहजयोगी महिलांमधे हायब्लड प्रेशर, ब्राँकायल अस्थमा, पोटाचे अल्सर इत्यादी आजरानी ग्रस्त असणाऱ्यांची संख्या सहजयोग करीत नसलेल्या महिलांपक्षा दहा पटीने कमी आहे.

भारतातही अशा प्रकारचे सर्व्हे घेण्याची योजना आहे. डॉ. एल. एस. उदालोव्हा, रशियातील अकौंटन्सी व स्टॅटिस्टिक्स विभागाचे प्रमुख व डॉ. इ. व्ही. शेतिनिना, ॲग्रिकल्चर ॲकॅडेमी मधील एक तज्ञ यांनी रशियातील सहजयोगाचे सामाजिक व आर्थिक परिणाम या विषयावर एक निबंध सादर केला. सहजयोग साधनेमुळे प्राप्त होणाऱ्या आरोग्य, कृषि, सामाजिक इत्यादी क्षेत्रातील लाभांमुळे मोठ्या प्रमाणावर खर्च कमी होऊ शकतो, कृषी उत्पादन वाढू शकते, पर्यावरणात सुधारणा होऊ शकते असे त्यांनी सिद्ध केले.

भारतातील इतर प्रांतात, विशेषतः उत्तरेकडे सहज योगाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे. महाराष्ट्रातही अधिकाधिक लोकांनी सहज योगाचा अंगीकार केल्यास ते फारच लाभदायी होईल.

●●●

# श्री योगी महाजनांनी केलेल्या मार्गदर्शनाचा सारांश

जगामध्ये सर्वत्र पूर्वीपासून मानवाच्या उन्नतीसाठी अनेक संतांनी खूप कष्ट घेतले. पण त्यांच्या कार्याचा व शिकवणुकीचा योग्य पाठपुरावा झाला नाही आणि भौतिक सुख-समृद्धीचा प्रभाव वाढून मानवांचे जीवन अधिकच समस्या प्रधान होत गेले. याचे एक कारण म्हणजे जे काही प्रयत्न झाले ते बुद्धिमधून होऊ लागले व त्यात अनुभवाला प्राधान्य कमी होते, प्रत्यक्ष अनुभव तर वेगळ्याच प्रकारचे होते. जी काही प्रगति झाली ती वस्तुनिष्ठ नव्हती तर व्यक्तिनिष्ठ झाली. आइनस्टाइनच्या सापेक्षतेच्या सिद्धांताप्रमाणे प्रत्येकाचे अनुभव सापेक्ष होते व त्याचा सामूहिक स्तरावर काही परिणाम झाला नाही. म्हणूनच देवधर्माची वेगवेगळी रुपे, पद्धति व पंथ निर्माण झाले. त्यात वरवरच्या गोष्टींची भर पडल्यामुळे उत्सवात देखावा, जाहिरात, भव्यता यांना जास्त महत्त्व येऊ लागले; मग आपोआप चढाओढ, कलह निर्माण झाले. या सर्वांचे मूळ कारण म्हणजे बुद्धीचा वापर वाढला की अहंकार बळावतो, कल्पनाशक्तीला चालना मिळते. म्हणूनच दिव्य स्वप्न पडणे, भास होणे, दर्शन घडणे यालाच लोक गैरसमजुतीने सत्य समजू लागले आणि अंतिम सत्यापासून वंचित राहिले.

अंतिम सत्य मन-बुद्धीच्या पलीकडे असल्यामुळे ते जाणणे हेच खऱ्या साधकाचे ध्येय असले पाहिजे व त्याचीच आज आवश्यकता आहे. शंकराचार्य जग मिथ्या, ब्रह्म सत्य असे म्हणाले त्याचा अर्थ ब्रह्म हे अंतिम सत्य असल्यामुळे ते जाणणे हाच अध्यात्मिक उन्नतीचा परिपाक आहे असा आहे. त्यासाठीच प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे अवतरण पृथ्वीतलावर आले व त्यांनी सहजयोग सुरू केला. सहजयोगाची सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याच्यातील गहनता सहजयोग्यांनी मिळवली पाहिजे व त्यासाठी सतत प्रभुला केला पाहिजे. त्यासाठी आपले लक्ष (चित्त) सतत कुंडलिनीकडे राहिले पाहिजे.

विज्ञानाची सर्व प्रगति बुद्धीमधून झाली आहे म्हणून तेहि एक प्रकारे अविद्या आहे. कुण्डलिनी पुन्हा पुन्हा वर आल्याशिवाय व सहस्रारांत स्थिरावल्याशिवाय बुद्धीचे काम थांबत नाही. बुद्धि चालत राहिली की कुण्डलिनीच्या उत्थानात अडथळा येतो, अहंकार बळावतो व अहंकारामुळे माणसाच्या स्वभावात आक्रमकपणा वाढत जातो. सहजयोग-ध्यानामध्ये कुण्डलिनी सहस्रारांत आल्यावर सहस्रार उघडते व बुद्धीच्या ऐवजी आनंद व प्रेम कार्य करू लागतात.

ही स्थिति मिळवण्यासाठी श्रीमाताजी जे सांगतात त्याच्यावर पूर्णपणे श्रद्धा ठेऊन त्याचा, शंका-तर्क वगैरे न करता स्वीकार केला पाहिजे. श्रीमाताजी आदिशक्ति आहेत व त्यांची दृष्टि (vision) फार फार दूरवरची आहे, अमर्याद आहे तर माणसाची बुद्धि व मन सीमित आहे. म्हणून आपल्या बुद्धीवर विसंबून राहण्यात अर्थ नाही. बुद्धीचे प्रश्न थांबवण्यासाठी कसल्याही घटनेबद्दल वा व्यक्तीबद्दल प्रतिक्रिया करणे कटाक्षाने थांबवले पाहिजे. लीडरच्या कार्यपद्धतीवर टीका करणे, गुप्स बनवणे इ. आक्षेपार्ह प्रकार बुद्धि चालल्यामुळे होतात व ते हितावह नाही. म्हणून बुद्धि न चालवता, एकसारखी प्रतिक्रिया न करण्याने साक्षीभाव वृद्धिंगत होतो व तुमचे चित्त कुंडलिनीकडे राहण्यास मदत मिळते व तुमच्या चित्ताला त्याची सवय होते.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सामूहिकता. माणूस स्वतःपुरताच विचार करत राहिल्यास अहंकार बळावल्याशिवाय राहणार नाही; आणि हीच गोष्ट सामूहिकतेला व सामूहिक चैतन्यशक्तीला हितकारक नाही. त्यासाठी हृदय प्रेमाने भरलेले हवे, म्हणजे मग प्रेम वाटण्याची इच्छा होते. मग सर्व सहजयोग्यांना, त्यांचे दोष नजरेआड करून तुम्ही उत्तेजन देऊ शकता. सहजयोगात शिक्षा हा प्रकार नाही म्हणून प्रेमशक्तीचाच वापर सतत वाढला पाहिजे. दुसऱ्याचे दोष व चुका नजरेआड करा व त्यांचे गुण पाहण्याची सवय करा. कार्य करण्यासाठी पुढे-पुढेच आले पाहिजे असे नाही; उलट स्वतः मागे राहून कार्य करत रहा.

हे सर्व मिळवण्यासाठी श्रीमाताजी सांगतात तसेच रहा. प्रत्येक प्रसंगात 'श्रीमाताजींनी यावेळी काय केले असते' हे आधी मनात आणा व त्याचे स्मरण ठेवा. असे करत राहिलात की तुमची कुंडलिनी प्रसन्न होईल व तुमची बुद्धि सुबुद्धि बनवेल. श्रीमाताजी सर्व सहजयोग्यांवर सारखेच प्रेम करतात, प्रेम हीच त्यांची शक्ति आहे. एखाद्या सहजयोग्याने चुका केल्या तरी त्याच्यावर त्या प्रेमच करतात. प्रेमशक्तीमध्ये सर्वांना खेचून घेण्याची लोहचुंबकासारखी शक्ति असते. म्हणून बुद्धि न वापरता सर्व काही परमचैतन्यावर सोपवायला शिका. स्वतःचे कर्तेपण सोडून सर्व काही परमचैतन्यच करत आहे हा भाव रुजला की दुसऱ्यांची कुंडलिनी जागृत करताना किंवा दुसऱ्यांना क्लिअर करताना त्यांचे त्रास (पकड) तुमच्या चक्रांना होण्याची काळजी करण्याची जरुर नाही. ''सर्व काही श्री माताजी करतात. मी काही करत नाही'' हे भान ठामपणे बाळगले पाहिजे. दुसरी कोणती रेकी वा तत्सम इतर साधना करणाऱ्या लोकांबरोबर वाद घालण्याचीही मग जरुर नाही.

सहजयोगात आल्यावर पूर्व-जन्म, प्रारब्ध, भोग, पुनर्जन्म हे सर्व संपलेले असते. तुम्हाला कसल्याही प्रकारची शिक्षा भोगावी लागत नाही. पुनर्जन्माचाही विचार करण्याची जरूर नाही; ते सर्व श्रीमाताजी बघणार आहेत. म्हणून सर्वव्यापी परमचैतन्याबरोबर संपर्कात राहणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे.

कुंडलिनी सहस्रारांत स्थिरावल्यावर तुम्ही परमचैतन्याबरोबर जोडले जाता व तुमचे चित्त प्रकाशित होते. असे प्रकाशित चित्त तुम्ही जिथे लावाल तिथे कार्य होणारच. म्हणून चित्त जास्त व्यापक गोष्टींकडे लावण्याचा प्रयत्न करा. समाज, राष्ट्र, जग इ. व्यापक क्षेत्रांकडे तुमचे चित्त लागले पाहिजे. संकुचित वा भौतिक गोष्टींकडे ते लावण्यात अर्थ नाही. म्हणून जोमाने बाहेर पडा व कार्याला लागा.

# श्रीकृष्ण पूजा

**प. पू. श्री माताजी निर्मला देवी यांचे भाषण (सारांश)**

**फ्रान्स : १६-८-८७**

आज या लहान मुलांनी इतक्या उत्साहाने केलेले सुंदर स्वागत पाहून श्रीकृष्णांच्या लहानपणाची आठवण झाली. त्योवळी त्यांचे सगळे बालमित्र त्यांना प्रेमाने व आदराने वागवत असत. इथे दोन्ही बाजूंनी वाहत्या पाण्याची सजावट केलेली पाहून श्रीकृष्ण यमुना नदीकाठी बासरी वाजवत असत त्याची आठवण येते. त्यांच्या सर्व बालपणाच्या हकीगती सामान्य माणसासारख्या वाटल्या तरी योग्य वेळ आल्यावर त्यांनी आपली शक्ति उघड केली व पुतनामावशी व कंसासारख्या दुष्टांना ठार मारले. मग ते द्वारकेला गेले व राज्य सांभाळू लागले. तेथे त्यांनी पाच स्त्रियांबरोबर विवाह केला. त्यांना आधीच सोळा हजार पत्नी होत्या. कित्येकांना हा प्रकार समजत नाही. त्यांचे आधिष्ठान असलेल्या विशुद्धी चक्राला सोळा पाकळ्या आहेत हे तुम्हाला माहीत आहेच. या सोळा व सहस्त्राराच्या एक हजार यांचा गुणाकार सोळा हजार होतो. ह्याच त्यांच्या सोळा हजार शक्त्या आहेत व सहजयोग्यांनाही त्या उपलब्ध आहेत. ह्या सर्व शक्त्या मेंदूमध्ये कार्य करत असतात. ह्या सर्व शक्त्या सहजयोगी म्हणून प्रकट न होऊ शकल्यामुळे एका राजाने बंदिवान केलेल्या सोळा हजार महिलांमधे प्रगट झाल्या. या बंदी महिलांची श्रीकृष्णांनी सुटका करून त्यांच्याशी विवाह केला. नंतर पंचमहाभूतांचा आविष्कार झालेल्या पाच स्त्रियांबरोबर विवाह केला.

अवतरणांना समजणे माणसाच्या सामान्य बुद्धीला अशक्य असते कारण त्यांचे कार्य वेगळ्याप्रकारे व उद्देशाने चालते. म्हणून त्याच्या पाठीमागील हेतू माणसाला आकलन होत नाही. आता तुम्ही म्हणाल "माताजी, हे कसं घडून आले?" असे विचारले तर मी दुसरेच काही तरी विचारते किंवा सांगते. पण आता मी तुम्हाला सहस्त्रारामधील सोळा हजार पाकळ्यांबद्दल सांगणार आहे.

कुण्डलिनीच्या जागरणानंतर आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर या सोळा हजार शक्त्या कार्यान्वित होतात. सहस्त्राराच्या प्रत्येक पाकळीमध्ये सोळा शक्त्या आहेत. या पाकळ्या पंचमहाभूतांपासून तयार केलेल्या आहेत. ही पाच तत्त्वे उजवी बाजू बनवतात आणि त्यापासूनच मेंदू बनवलेला असतो. मेंदूचा आतील भागाच्या (gray matter) बाहेरच्या बाजूने पांढऱ्या कणांपासून बनलेले (white matter) आवरण असते. प्रयेक पाकळीवरच्या सोळा शक्त्या डाव्या बाजूकडून येतात. श्रीकृष्ण हे डाव्या बाजूकडून आलेले अवतरण आहे. वर सांगितलेल्या पाकळ्यांवरील शक्त्या मेंदूमधे आहेतच. माणसामधील मज्जासंस्थांचे सर्व कार्य ही पंचतत्त्वे व प्रत्येक पाकळीवरील सोळा शक्त्यांकडून चालवले जाते. उदा. आपल्याला हात उचलायचा असेल तर प्रथम डाव्या बाजूकडून इच्छा निर्माण होते व त्यानुसार पंचतत्त्वांकडून कार्य करवून घेतले जाते. त्याचप्रमाणे आपल्या मज्जासंस्थेमधे Reflex Action करवून घेण्याची व्यवस्था आहे. मानवी जाणीवेमधून होणारे कार्य Reflex Action म्हणून होत नाही. पण कुण्डलिनी सहस्त्रारात आली की सहस्त्राराच्या सर्व पाकळ्या प्रकाशित होतात, तसेच शरीरातील सर्व नसांमधे व तुमच्या चित्तामध्ये प्रकाश येतो. आणि त्यातूनच तुम्ही सामूहिक चेतनेबरोब जोडले जाता. हे समजण्याठी एक उदाहरण म्हणून सांगायचे तर समजा जवळ-जवळच्या पाच घरांमधे मिळून सोळा माणसे आहेत. त्यांचे आपापले काम चालत असते पण जर एकदम पूर आला तर ती सर्व सोळा माणसे एकत्र येऊन पुरापासून रक्षण करण्याचे कार्य करतात. म्हणजे ती सर्व माणसे सामूहिक चेतनाशक्ति वापरतात. अगदी याचप्रकारे कुण्डलिनी सहस्त्रारात आल्यावर तुमच्या सर्व सुप्त शक्त्या जागृत होतात आणि कार्याला लागतात. सहस्त्राराच्या सर्व पाकळ्या जागृत व मेंदूमधून कार्यान्वित करणाऱ्या या शक्तीलाच विराट-शक्ति म्हणतात. याच शक्तीमुळे श्रीकृष्ण विराट स्वरूपात येतात. सध्याच्या आधुनिक युगामधे हे विराट कोण आहेत हे तुम्ही जाणताच; अर्थात आदिशक्तीच विराट रुप घेते आणि तुम्हाला आत्मसाक्षात्कार होतो. म्हणजेच कुण्डलिनी जागृत होऊन सर्व चक्रांमधून पार होत सहस्त्रारात स्थिरावली की मेंदूमध्ये प्रकाश येतो आणि विराट शक्ति जागरुक होते. याच वेळी कुण्डलिनी सारे मस्तक भरुन टाकते व मस्तकामधून बाहेर पडत असतानाच मेंदूमधून खाली येऊ लागते व मानवाच्या सिंपथेटिक संस्थांमधे पसरू लागते व त्याचा परिणाम होऊन तुम्ही शांत (Relaxed) होता. सिंपथेटिकला आराम मिळाल्यामुळे सुषुम्ना मोकळी होऊन कुण्डलिनी अधिक जोमाने वर येते. हीच कुण्डलिनीची Reflex Action. कुण्डलिनी हे सर्व आपोआप घडवून आणते, जागृत होऊन वर चढते. चक्रे स्वच्छ व प्रकाशित करणे, मेंदूला प्रकाशित करणे, सिंपथेटिकला आराम देऊन अधिक जोमाने वर येणे ही तिची स्वभाविक व अंगभूत शक्ति आहे. कुण्डलिनीजवळ असणारी आणखी एक विशेष शक्ति म्हणजे ती मला ओळखते. म्हणूनच अनेक लोकांची कुण्डलिनी नुसत्या माझ्या फोटोमुळे जागृत होते. पण जर एखाद्याची चक्रे फारच क्षीण झालेली

असली तर कुण्डलिनी तिथेच थांबते. म्हणून काही लोकांना साक्षात्कार पटकन मिळतो तर काहींना वेळ लागतो. कण्डिशनिंग फार असेल तर अवघडच जाते. तसेच ज्या ठिकाणी संतांचे वास्तव्य असते तिथेही कुण्डलिनी लवकर जागृत होते; सरळ स्वभावाच्या लोकांनाही काही त्रास होत नाही. कॅथॉलिक चर्चची शिकवण मात्र फार चुकीची आहे. लैंगिक संबंधाला ते पाप आहे असे सांगतात! हे बरोबर म्हणायचे तर जगामधे ॲडम आणि ईव्ह हे दोघेच राहिले असते.

श्रीकृष्णांच्या काळीही असे कर्मठ लोक बरेच होते; ते इतके एका बाजूला झुकलेले तामसी होते की राग आल्यावर दृष्टिक्षेपात दुसऱ्याला भस्म करून टाकायला कमी पडत नसत; त्यांच्याशी साधे बोलणेही महा कठीण काम. तसेच धर्माच्या बाबतीतही नसता उपास-तापास, सोवळे-ओवळेपणाचे प्रस्थ माजले होते. लैंगिक संबंधाला कसल्या मर्यादा नव्हत्या. म्हणून श्रीकृष्णांचे अवतरण झाले, कंसाचा वध करणे एवढाच त्यांचा उद्देश नव्हता तर लोकांना धर्म म्हणजे काय हे त्यांना सांगायचे होते. म्हणून नैसर्गिक नियम पाळणारा, योग्य त्या मर्यादा पाळणारा धर्म त्यांना अपेक्षित होता. वैवाहिक स्त्री-पुरुषसंबंधच अशा धर्माला मान्य असतात. पण कृष्णाला पाच आणि सोळा हजार पत्नी होत्या हे लोकांना समजत नाही व विचित्र वाटते. ते योगेश्वर होते हे मी तुम्हाला सांगितले आहेच; योगेश्वर म्हणून सर्व भौतिक संबंधांच्या ते पलिकडे होते म्हणून त्यांनी किती विवाह करावे हा प्रश्न वा नियम त्यांच्या बाबतीत लागू नाही. माझ्यासारख्या योगेश्वरीला किती मुले आहेत हाहि प्रश्न त्याचप्रमाणे लागू होत नाही. सर्व अवतरणांचे वागणे त्या त्या कालानुरुप होते. श्रीकृष्णांना कुणाला कसे ठार करायचे हे चांगले माहित होते. म्हणून अवतरणे जशी वागतात तसेच आपण करावे हा विचार योग्य नाही; कारण त्यांच्यासारखा दैवी व परिपूर्ण विवेक सामान्य माणसाला नसतो. उदा. सर्व ख्रिश्चन मंडळींना आपण सुळावर जावे असे वाटणे! ख्रिस्त आज्ञा-चक्र उघडण्यासाठी सुळावर गेले. तुमच्यासाठी त्यांनी हे दिव्य केले आणि तुमचा मार्ग खुला केला. म्हणून सामान्य माणसाच्या बुद्धीमधून अवतरणांना जाणण्याचा प्रयत्न करण्यात अर्थ नाही. त्यामुळेच लोकांनी अवतरणांना आपल्या कोत्या बुद्धीनुसार व स्वार्थासाठी संकुचित करून ठेवले.

माणसांनी अपराधीपणाची भावना अजिबात बाळगू नये. तुम्ही काहीही पाप केले नाही याचा विश्वास बाळगा. चर्चमधील शिकवणुकीचा हा परिणाम आहे; म्हणून प्रायश्चित करून घेण्यात फक्त तुमचाच पैसा खर्च होणार आहे. देवाच्या दृष्टीने त्याला काही अर्थ नाही. श्रीकृष्णांनीही तेच सांगितले व आत्मसाक्षात्कार मिळवण्याचा मार्ग सर्वांसाठी आहे असेही ते म्हणाले. विराटांनी तुम्हाल उत्क्रांतीच्या एका स्तरावर आणले आहे अणि आता तुम्ही सुंदर फुले बनणार आहात. आजचा दिवस म्हणूनच आनंदाचा आहे; समाधानाचा आहे. ते मिळवतानाही तुम्ही तुमच्या मर्यादा सांभाळल्या पाहिजे. आता तुमचा मेंदूही प्रकाशित झाला आहे आणि त्याची क्षमता आता इतकी प्रखर झाली आहे की तुमच्या सूक्ष्म शरीराच्या पंचतत्त्वांपासून बनलेल्या सर्व कोषांमधून तो पार होणार आहे. तो ईथरच्या (ether) सूक्ष्मतेलाही तसेच पृथ्वी व इतर तत्वांच्या सूक्ष्मतेलाही स्पर्श करणार आहे. मेंदू प्रकाशित झाल्यावर तुम्ही इतके सूक्ष्म बनता. मग तुम्हाला कसल्याही भौतिक गोष्टींची काळजी करण्याची जरूर राहणार नाही. कारण त्या सर्व गोष्टी लोहचुंबकाप्रमाणे सूक्ष्मतेकडे खेचल्या जाणाऱ्या असतात. एकदा ऑस्ट्रेलियामधे खूप जास्वंदीची फुले पाहिल्यावर मी तेथील सहजयोग्यांना पूजेला ती आणावयास सांगितले, पण आयत्यावेळी ते विसरले. (या देवी, सर्व भूतेषु भ्रांतिरुपेण संस्थिताः) पण आम्ही पूजेला पोचलो तेव्हा आधीच तेथील मंडळींनी जास्वंदीची भरपूर फुले आणली असल्याचे दिसले. विराटाचे कार्य असे चालते. तुम्हाला जे हवे असेल ते मिळणार. आश्रम हवा असेल तर तोही बनेल! (खूप आनंदात टाळ्या) तुमचे चित्त जेथे जाईल तिथे कार्य होणार. पण त्यासाठी आपण साक्षात्कारी आत्मा आहो हे भान तुमच्याजवळ सतत जागृत असले पाहिजे. तुम्ही विशेष कार्यासाठी निवडलेले विशेष लोक आहात हे लक्षात घ्या. म्हणजे तुम्ही साऱ्या भौतिक गोष्टींवर नियंत्रण ठेऊ शकाल व सर्व तुमच्या मनासारखे घडून येत असल्याचे पाहून तुम्हालाच आश्चर्य वाटेल. हीच तुमच्या सहस्त्राराची शक्ति आहे.

विराटाच्या बारा व श्रीगणेशांच्या चार अशा सोळा शक्त्या तुमच्या मेंदूला मिळाल्या आहेत. त्यामुळे तुमचे भावनिक जीवन, इतरांबरोबरचे संबंध, वैवाहिक जीवन सर्व काही व्यवस्थित होते. ही शक्ति तुमच्यामधे आजपर्यंत सुप्त होती म्हणून बहीण-भाऊ, पती-पत्नी इ. संबंधातील सुंदरपणा तुम्हाला समजला नव्हता; विचित्र कल्पना, असत्य प्रकार, रुढी यामुळे मेंदूचे हे कार्य बिघडलेले होते आणि म्हणून सर्व काही उजव्या बाजूने चालले होते. डावी बाजू नसल्यासारखी झाली होती. त्यामुळे उजव्या बाजूचा प्रभाव पडून फक्त अहंकार पोसला गेला. त्याला खतपाणी मिळत गेल्यामुळे पैशाचे महत्त्व वाढले. हे अनिर्बंधपणे चालले आहे हीच पाश्चिमत्य लोकांची मोठी समस्या आहे. त्यांचे सर्व सबंध पैशावर आधारित आहेत. सर्व क्षेत्रांमध्ये पैसाच महत्वाचा झाला आहे. पावित्र्य, अबोधिता, कला इ. गुणांना किंमत राहिली नाही म्हणून तुम्ही समजूतदारपणाने तुमची डावी बाजू सुधारली पाहिजे. नाही तर तुम्ही आळशी, निरुत्साही, शुष्क व व्यसनाधीन बनाल. तुम्ही सर्वजण सामुहिकतेमधून प्रत्येकाला सुधारू शकता. ते अशक्य अजिबात नाही. टीका करण्याच्या, दोष काढण्याच्या मागे न लागता स्वतःच्या उन्नतीकडे लक्ष द्या.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

●●●

# चक्रांची स्वच्छता कशी ठेवायची

*(मागील अंकावरुन पुढे चालू)*

## आज्ञा चक्र

मध्य भाग

**मंत्र :** १) जिझस मेरी माता - महालक्ष्मीचा मंत्र म्हणा.

२) **आव्हान** - श्री माताजी मला क्षमाशील व त्यागी बनवा.

३) चैतन्य लहरी - जेथे 'डोळयांच्या नसा' व 'पिचूटरी नसा' एकमेकांना छेदतात तेथे द्या.

४) जेव्हा कुंडलिनी आज्ञा चक्रावर येते तेव्हा असे समजले पाहिजे की तिने तुमच्या जुन्या कर्मांना क्षमा केली आहे.

जुन्यांना क्षमा करा व त्या विसरुन जा. पुढील आयुष्य आपणापुढे अस्तित्वात असत नाही. करिता वर्तमान स्थितीत नेहमी रहा.

५) 'जाणीवपूर्वक निर्विचारता' वृद्धींगत करा, सतर्क रहा. पण विचार करु नका. निर्विचार समाधीत रहा. त्यामुळे आपली जादा विचार करण्याची सवय कमी होईल.

६) परमेश्वराची प्रार्थना करा.

७) श्री माताजींचे आज्ञा चक्र निर्विकल्प वृत्तीने न्याहाळा.

८) चैतन्य लहरीयुक्त कुंकू कपाळावर लावा. त्यामुळे तुमचे आज्ञा चक्र सुरक्षित राहील.

९) तुमच्या विचारातील अडथळा ब्रह्मशक्तीच कमी करेल. त्यामुळे तुमचे विचार व चित्त शुद्ध व मोकळे होईल.

१०) हे चक्र उद्युक्त करण्याकरता अग्नीचा वापर करा.

११) भोंदू गुरुकडून त्रास होत असे तर ती बाधा घालवावयास बरोच उपचार करावे लागतील.

(भावसागराप्रमाणे उपचार करा)

### डावे आज्ञा चक्र (प्रती अहंकार - मागील अहंकार)

१) **मंत्र :** महागणेश, महाभैरवनाथ, महाहिरण्यगर्भ - महावीर व गौतम बुद्ध व महाकालीचा मंत्र म्हणा.

२) **आव्हान** - श्री माताजी आपल्या कृपेत मला क्षमा करा.

३) चैतन्य लहरी मागील आज्ञा चक्र व डोक्याची आपली उजवी बाजू व वरील डोके यांना द्यां.

४) दोषी भाव न ठेवता क्षमा मागा.

५) डोळ्याच्या दुषित भावना दूर करा - (हे तुमच्या डाव्या मूलाधाराशी संबंधीत असते.)

६) डोक्याच्या मागील बाजूस मेणबत्तीचा उपचार करा.

७) डावा हात माताजीकडे व उजवा हात मागील डोक्यावर ठेवून उंच बघा.

८) प्रती अहंकाराचा ताबा कमी करण्याकरीता - उजवा हात कपाळावरुन, डाव्या बाजूने इडा नाडीवरुन खाली सोडा - (ही महाकालीची शक्ती आहे.)

९) डोक्यांत व उजव्या बाजूस अतिउष्णता असेल तर बर्फ ठेवा.

१०) काही वेळा प्रती अहंकाराचा ताबा एवढा होतो, की तो अहंकाराला खाली रेटतो व तो विशुद्धी चक्रांत येतो. (घशात व डोक्याच्या खाली कदाचित आपणास विशुद्धीची पक्कड आहे का? असा भास होईल. पण तसे नसते. त्याला वरील प्रमाणे उपचार करा.

११) भूतकाळांत वास करु नका. जुन्या गोष्टी - जुनी नाती व बाह्यातकारी गोष्टी यांचा प्रतिअहंकारावर परिणाम होतो. निरुपयोगी बंधने वा सवयी सोडून द्या.

१२) आपला प्रति अहंकार माताजींना समर्पित करा.

### उजवी बाजू - अहंकार - समोरील आज्ञा

१) **मंत्र :** महाकार्तीकेय, महाहनुमान, महाबुद्ध व महासरस्वतीचा मंत्र म्हणा.

'महत अहंकार नश होवो' असे म्हणा.

२) **आव्हान :** श्री माताजी मी सर्वांना - मला सुद्धा - क्षमा केली आहे. आपल्या कृपेत 'मला आपल्या दैवी - चिंतात ठेवा.'

३) चैतन्य लहरी - मध्य आज्ञा चक्र अहंकाराकरीता डावी बाजू व वरील डाव्या बाजूचे डोके यांना द्या.

४) अहंकाराचा त्रास कमी करण्याकरिता वरीलप्रमाणे हात फिरवनू उजवी पिंगला नाडीवर टाका (महासरस्वती शक्ती)

५) अहंपणा वाढत चालाल - प्रतिअहंकार दाबला

जातो व त्याला खाली नेण्यामुळे - माणसाची - 'आठवण शक्ति' कमी होते. हे कमी करावयाचे झाल्यास वरील ४ प्रमाणे कार्य करते.

६) सर्वांना क्षमा करा, कुणाबद्दलही नावड मनांत आणू नका. आपल्या प्रकाशात त्याला क्षमा करा - ते आपल्या संरक्षणाचे उत्तम शस्त्र आहे. त्यामुळे आपले दुरविचार थांबतात. क्षमेमुळे तुमची अध्यात्मिक शक्ति वाढते. त्यामुळे कुंडलिनीचे सहस्त्रावरील प्रयाणाचे दार उघडले जाते.

७) भगवान जीसस आपला अध्यात्मिक पुनर्जन्माचे दार उघडीत आहे हे पहा, आपले आज्ञा चक्र स्वच्छ झाले म्हणजे - आपल्या अंतरमन- जाणीवेवर प्रकाश पडतो. तो प्रकाश प. पू. श्री माताजींचाच असतो.

८) बिन आत्मसाक्षात्कारी पुरुषाला तुमच्या आज्ञा चक्रावर कुंकू लावावयास सांगू नका.

९) आपल्या मध्य, डावी व डोक्यावरची बाजू गरम होत असेल तर बर्फाचा उपचार करा.

१०) भविष्यवादी होऊ नका. भविष्य असत नाही. नेहमी वर्तमानांत रहा. आपले उजवे स्वाधिष्ठान पकडले असेल तर उजवे आज्ञा चक्र देखील पकडलेले असते. ह्याच चक्रावरच्या उपचाराप्रमाणे करणे.

११) जिझसकडे पहा - चर्चने दिलेले बंधन अव्हेय.

१२) ध्यानांत आज्ञाचक्रावरील ध्यान करु नका. काही गुरु चित्त नाक-डोळ्यासमोर ठेवा म्हणतात पण तसे करु नका. मनावर ताबा ठेवू नका. मानसिक - रोग हा उजव्या आज्ञाचक्रापासून उद्‌भवते.

१३) आपले नाव घालून त्याला जोडेपट्टी अहंकार घालविण्याकरिता करा.

१४) आपण आपला अहंकार प. पू. श्री माताजींच्या चरणावर समर्पण करा.

१५) आक्रमक वृत्ती सोडून मवाळपणा अंगीकारा.

## सहस्त्रार चक्र

१) **मंत्र :** श्री माताजींचे तीन मंत्र म्हणा.

२) **आव्हान -**

श्री माताजी - कृपया मला आत्मसाक्षात्कार द्या.

श्री माताजी - कृपया आपण माझ्या सहस्त्रारांत या.

श्री माताजी - कृपया माझे आत्मसाक्षात्कार स्थिर करा.

श्री माताजी - कृपया माझे समर्पण स्वीकारा व मी आपला आपण मला सहजयोग दिल्याबद्दल अत्यंत आभारी आहे.

३) सहस्त्रावर चैतन्य लहरी द्या.

४) ध्यानमार्गे आपला निश्चय वाढवा. नुसती संमती नाही पण दृढनिश्चय हवा. ती प्रत्येक परमाणुत आहे व त्यानीच ही सृष्टी निर्माण केली आहे.

५) लक्षात ठेवा की, तिनेच आपणाला आत्मसाक्षात्कार दिला आहे. पूर्वीच्या अवताराने तसे केले नाही. पण तुम्ही त्यांना श्री माताजीत आहात असे म्हणून पुजू शकतात.

६) सर्व अवतरांची सामुदायिकता तिच्या अवतरणामुळे साध्य होत आहे.

७) येशू खिस्ताने जे आचरणांत आणावे म्हटले ते प. पू. श्री माताजींनी पूर्णावस्थेत नेले. त्याने सांगितले होते, की मी एक - सान्तंवन करणार, सल्लागार, अद्धारक पुण्यात्मा पाठविणारा आहे ते आपणास सर्व शिकवेल.

८) ती नकारात्मक शक्तिचा सामुदायिक शक्तीने मुकाबला करेल हीच ती कलकीची एकदशरुद्राची शक्ती असेल.

९) तुमचे नाते आदिशक्तिशी बलवान व स्थीर ठेवा. हे आपण कुंडलिनीच्या मार्फत करु शकता. तरच ब्रह्मशक्ती आपणास शुद्ध करेल व आपणास आत्मसाक्षात्काराचा आनंद मिळेल.

१०) **डाव्या सहस्त्राराची समस्या -** (म्हणजे साधकाचा उजवा भाग)

आव्हान - आपण सर्व चढ चढून जाण्यात यशस्वी आहात. (कलकीची शक्ती)

११) **उजवे सहस्त्रार** (साधकाचा डावा भाग) आपल्या कृपेत मी सर्व आव्हाने पेलली व मी ही सर्व आव्हाने जिंकून यशस्वी होईन.

श्री माताजी आपल्या कृपेत मी आपल्या आत्म्यांत व चित्तात सुखी व समाधानी आहे.

१२) श्री माताजीनी सर्व आशा, आकांक्षा व इच्छा पूर्ण केल्या. आता आपण आपली जागा स्थिर करावी लागेल कारण आता आपण परमेश्वराच्या साम्राज्यात आलो आहोत.

●●●







THANK YOU
MOTHER

# सांगली केंद्रातर्फे साखर कारखान्यावर झालेल्या कार्यक्रमाची क्षणचित्रे







